संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# महा धुरंदर बजेट

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. ०७ मार्च २०२६

- ७,६९४६७ कोटींचा अर्थसंकल्प सादर
- शेतकऱ्यांसाठी दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर
- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू राहणार
- १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल'
- २०४७ पर्यंत 5 ट्रिलियन डॉलरचं लक्ष्य
- दंडाची रक्कम १ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव
- जुन्या वाहनांवर वाढणार पर्यावरण कर
- महसूल वाढवण्यासाठी पायाभूत सुविधांवर भर

***मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचा 7,69,467 कोटींचा 2026–27 आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. 40,552 कोटींच्या महसूली तूटीचा हा अर्थसंकल्प आहे. ही महसूली तूट 2025-26 मध्ये 37056 कोटी होती. आता तुटीत वाढ झालेली दिसून येत आहे.***



अर्थसंकल्पात राजकोषीय तूट 1,50,491 कोटी आहे. ही वित्तीय तूट राज्य उत्पन्नाच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात राज्य सरकारला यश आलं आहे. राज्याच्या एकूण कर्जाच्या आकड्यात वाढ होऊन तो 11,02,654 कोटींवर पोहोचला आहे. मागील वर्षी हा आकडा 9,73,989 कोटी इतका होता. अर्थमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प मांडला. अर्थसंकल्प मांडणारे ते पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. हा अर्थसंकल्प दिवंगत अर्थमंत्री अजित पवार यांना समर्पित करत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं. याचबरोबर फडणवीस यांनी विधानसभेत अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत.

1. हा अर्थसंकल्प 2047 च्या विकासाकडे जाणारा आहे. महात्मा फुले यांच्या जन्माला 200 वर्ष पूर्ण होत आहे. यासाठी एक समिती स्थापन करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी निधी दिला जाईल. संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा केल्या जातील. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचं काम पूर्ण झालं आहे. ग्रामसमृद्धी अभियान राबवलं जाणार आहे.
2. अजित दादा पवार यांनी 11 वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्या करडी स्वभावामुळे शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणून अजित दादा पवार यांचे भव्य स्मारक उभारले जाईल. त्यांच्या नावाने नागरी पुरस्कार सुरु केला जाईल. हा अर्थसंकल्प मी त्यांना समर्पित करतो, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.
3. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा तिसरा टप्पा मंजूर करण्यात आला आहे. ग्रामसडक योजनेअंतर्गत ३० हजार गावे जोडली. २४५० किमी रस्त्यांची कामं पूर्ण झाली असून २३ हजार पूलांचं काम हाती घेतलं आहे. मुंबई-पुणे जलदगती ट्रेनसाठी तरतूद करण्यात आली आहे.
4. गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूरांचाही सहभाग करणार असल्याची घोषणा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे. 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे. चारही कृषि विद्यापीठात एआयची मदत घेतली जात आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. अॅग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारी पर्यंत झाले आहे. चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात होणार आहे.
5. राज्याचे नवे गुंतवणूक धोरण जाहीर करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सुक्ष्म व लघू केंद्र स्थापन केले जातील. सूक्ष्म, लघु आणि मध्य उद्योग केंद्र उभारणार आहोत. ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहे. प्रधानमंत्री सौर योजनेअंतर्गत रुफ टॉप सोलर बसवणार, बांबू विकास प्रकल्प वाढवणार, परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल आहे. मुंबई आणि पुण्यात 50 अब्ज डॉलरचे केंद्र तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. गडचिरोली नवं स्टील हब म्हणून उदयास आले आहे.

कर्जमाफीमुळे 35 हजार कोटींचा सरकारवर येणार बोजा- शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करत, 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीककर्ज थकीत असलेल्या, पात्र शेतकऱ्यांचे 2 लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. तसेच नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50 हजारांचे अनुदान देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत ही मदत केली जाणार आहे. यासाठी सरकारवर साधारण 35 हजार कोटींचा बोजा सरकारवर येऊ शकतो, असा अंदाज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदान योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यावर सरकार भर देणार आहे. यासंदर्भात समितीच्या शिफारशींनुसार कार्यवाही केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याची व्यवस्था करण्यात येणार असून यंदा 14 हजार मेगावॅट वीज निर्मिती क्षमता वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

सगळ्यांची उत्सुकता असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढील वर्षीही सुरू राहणार असून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केलं. पण, यासाठी किती निधी देणार, हे मात्र मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात सांगितलं नाही. गेल्यावर्षीच्या 2025–26 च्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी 36 हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त निधी मंजूर झाल्यानं एकूण खर्च सुमारे 42 हजार कोटींवर पोहोचला होता. पण, यंदा संपूर्ण महिला बालविकास विभागासाठी 24231.28 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच एकल महिलांसाठी स्वतंत्र योजना आणली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. योजनेच्या हप्त्यात कोणतीही वाढ होणार नाही, असेही त्यांनी नमूद केलं.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता, "लाडकी बहीण योजना महिला व बालकल्याण विभागाच्या अंतर्गत असली, तरी वैयक्तिक लाभाच्या योजनांचा निधी संबंधित विभागांकडून दिला जातो. तरीही निधी वळवला जातो, अशा बातम्या येतात. यंदाच्या अर्थसंकल्पातही या योजनेसाठी मागील वर्षाप्रमाणेच 36 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे."

13 जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल'- राज्यातील महिला बचत गटांच्या माध्यमातून आतापर्यंत 27 लाख 'लखपती दीदी' तयार झाल्या आहेत. 2026–27 या वर्षात आणखी 25 लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या उत्पादन आणि विक्रीला चालना देण्यासाठी 13 जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महसुली तूट १ टक्क्यांपर्यंत कमी

यावर्षी अर्थसंकल्पासाठी 7 लाख 69 हजार 467 कोटी रुपयांची खर्चासाठी तरतूद करण्यात आली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात 40 हजार 552 कोटी रुपयांची तूट येत आहे. राजकोषीय तूट ही 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासन यशस्वी ठरले आहे, तसेच महसुली तूट ही 1 टक्क्यांपेक्षा कमी राहिली आहे.

राज्य सरकारनं महाराष्ट्राला 1 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. 2047 पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचवण्याचं लक्ष्य जाहीर केलं आहे. या उद्दिष्टासाठी शेती क्षेत्राचा जीडीपी 55 अब्ज डॉलरवरून 500 अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पादन 123 अब्ज डॉलरवरून 1500 अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचं लक्ष्य सरकारनं ठेवलं आहे.

दंडाची रक्कम 1 लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव- क्रेनवर आधारित वाहनांवर सध्या वाहनाच्या किमतीच्या 7 टक्के दराने एकरकमी कर आकारला जातो. मात्र, महागडी वाहने इतर राज्यांत नोंदणी केली जात असल्यानं या कराची कमाल मर्यादा 30 लाख रुपये करण्याचा प्रस्ताव सरकारनं मांडला आहे. वाहन वितरकांना देण्यात येणारे व्यवसाय प्रमाणपत्र सध्या 5 वर्षांसाठी वैध असते. मात्र, कर दरवर्षी भरावा लागतो. त्यामुळे या व्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तसेच मुद्रांकावर दस्त नोंदणी न केल्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर सक्तमजुरी आणि दंडाची तरतूद आहे. या दंडाच्या रकमेची किमान मर्यादा 5,000 रुपयांवरून 1 लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्क टाळण्याच्या प्रकारांवर नियंत्रण येईल, असा सरकारचा दावा आहे.

जुन्या वाहनांवर वाढणार पर्यावरण कर- सेवा क्षेत्राचे स्थूल उत्पादन 312 अब्ज डॉलरवरून 3000 अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. राज्यात BS-IV आणि त्याखालील उत्सर्जन मानक असलेल्या खासगी वाहनांवरील पर्यावरण कर वाढवण्याचा प्रस्ताव सरकारनं मांडला आहे. या प्रस्तावानुसार दुचाकी वाहनांवरील कर 2,000 वरून 4,000 रूपये करण्यात येणार आहे. तसेच नॉन-ट्रान्सपोर्ट श्रेणीतील पेट्रोलवरील हलक्या मोटार वाहनांसाठी पर्यावरण कर 3,000 वरून 6,000 रूपये तर डिझेलवरील हलक्या मोटार वाहनांसाठी3,000 रुपयांवरून 7,000 रूपये करण्याचा प्रस्ताव आहे. जुन्या आणि अधिक प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा वापर कमी करून राज्यातील पर्यावरणीय मानके सुधारण्याचा यामागचा उद्देश असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे. राज्यात पायाभूत सुविधांमध्ये आतापर्यंत सर्वाधिक अशी 21% वाढ झाली आहे. पनवेल ते कर्जत रेल्वेमार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून हा मार्ग लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. राज्यातील 1 हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व गावांना कॉंक्रिट रस्त्यांनी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच राज्यात 1,200 किमी मेट्रो मार्ग आणि 6,000 किमी द्रुतगती मार्ग विकसित करण्याचं नियोजन आहे. दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गाशी 2028 पर्यंत जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत, तर वर्सोवा–भाईंदर किनारी मार्ग डिसेंबर 2028 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. याशिवाय 2019 पर्यंत 165 किमी मेट्रो मार्गिका तयार करण्याचं नियोजन आहे. लातूर आणि बारामती विमानतळांवर रात्रीच्या उड्डाणांसाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात येणार आहे.



मुंबई महानगर क्षेत्रात जलमार्गांची लांबी 340 किमीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सध्याची 1 कोटी 60 लाख प्रवासी संख्या 7 कोटींपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

राज्यानं 2047 पर्यंत स्वच्छ उर्जेचे उद्दिष्ट ठेवलं आहे. मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजनेसाठी 32,756 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. यंदाही 20,000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेमुळे महाराष्ट्राची गिनीज बुकमध्ये नोंद झाली आहे.

राज्यातील डिजिटल पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान मजबूत करण्यासाठी राज्य सरकारने जिओ-टेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर स्थापन करण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, या केंद्राच्या मदतीनं प्रगत नकाशे आणि डेटा तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणं करता येईल. प्रशासनाचे कामकाज सुधारेल. या उपक्रमामुळे पायाभूत सुविधा, शहरी विकास, शेती आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांतील नियोजन अधिक चांगल्या पद्धतीनं करता येईल.

राज्यातील हरित क्षेत्र 22 टक्क्यांवरून 33 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून पुढील 7 वर्षांत 300 कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट आहे. राज्याची राजकोषीय तूट 2.8 टक्के, तर महसुली तूट 1 टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याचे कर्जाचे प्रमाण 18.5 टक्के आहे. तसेच भांडवली गुंतवणुकीत 21 हजार कोटी रुपयांची वाढ करण्यात आली असून राज्याचा वाढदर 7.3 टक्के असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या अर्थसंकल्पावर विरोधकांनी टीका करत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार नसल्याचं म्हटलं आहे. शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी बोलताना म्हटले, "मी 35 वर्ष अर्थसंकल्प आमदार म्हणून पाहतो आहे. पण, आजपर्यंत आकडे न देता असा अर्थसंकल्प सादर झालेला नाही. प्रत्येक योजनेसाठी किती निधी देत आहोत किंवा आधीच्या योजनेला किती पैसे दिले, हे सांगितले जातं. पण, यात कोणत्याही निधीचा आकडा सांगण्यात आलेला नाही. सरकारचा हा अर्थसंकल्प सामान्यांच्या हिताचा नाही."

6. मुंबईत केंद्राच्या मदतीने इंडियन इन्स्टिट्यूट क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी सुरु, पुणे हे जीसीसीसाठी देशात सर्वाधिक पसंतीचे शहर आहे. जगात गेमिंग क्षेत्रात अव्वल होण्यासाठी महाराष्ट्रात 295 पेक्षा जास्त गेमिंग स्टुडिओ तयार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
7. सातारा जिल्ह्यातील वासोटा किल्ल्यावर पर्यटकांसाठी रोप वे प्रकल्प उभारणार आहोत. नागपूरच्या रामटेकमध्ये तिसरी चित्रसृष्टी उभारणार आहोत.
8. मुंबईत अजून एक भुयारी मेट्रो करणार, अटल सेतू मुंबई विमानतळाला जोडणार, राज्यात 1 हजार 200 किमीचे मेट्रो मार्ग उभारणार आहोत. 6 हजार किमीचे द्रुतगती मार्ग विकसित करणार आहोत. 2029 पर्यंत 165 किमी मेट्रो मार्गिका तयार करणार आहोत. दक्षिण मुंबईला 2028 पर्यंत समृद्धी महामार्गासोबत जोडणार आहोत. वर्सोवा-भाईंदर किनारी मार्ग डिसेंबर 2028 पर्यंत पूर्ण करणार, पनवेल ते कर्जत मार्ग अंतिम टप्प्यात, लवकरच वाहतुकीसाठी खुला करणार असल्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली.
9. कर्जमाफी योजना राबवण्याचं आश्वासन दिलं होतं. 30 सप्टेंबर 2025 रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करत असल्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच, नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल, असेदेखील त्यांनी सांगितले.
10. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अशीच सुरु राहणार आहे. या योजनेकरता आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## शेतकरी, ग्रामीण महाराष्ट्रासाठी मोठ्या घोषणा

- गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूर यांचाही सहभाग करणार
- पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे
- 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे
- चारही कृषि विद्यापीठात एमआयची मदत घेतली जात आहे
- शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे
- अॅग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे
- 1 कोटी 31 लाख फार्मर आयडी फेब्रुवारीपर्यंत झाले आहे
- चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील
- आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात
- गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचा ही समावेश करणार
- महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल

## कर्जमाफीसाठी कोणते शेतकरी पात्र ठरणार?

- दोन लाख रुपयांपर्यंतची थकबाकी असलेले शेतकरी.
- ज्यांचं पीककर्ज थकलेलं आहे असे शेतकरीच पात्र असतील.
- 30 सप्टेंबर 2025 पर्यंत थकीत असलेले कर्ज माफ होणार.
- नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार प्रोत्साहन लाभ.

## अर्थसंकल्पातून काय स्वस्त झालं?

मधुमेहावरील उपचार, कर्करोगवरील औषधं, क्रीडा साहित्य, वैद्यकीय उपकरणे, सौर पॅनल

## अर्थसंकल्पातून काय महाग झालं?

दारु, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ

## संपादकीय

# अन्यायाविरोधात लढणाऱ्या 'निर्भया' आणि साठा प्रश्नांची कहाणी

गेल्या काही दशकांचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येते की, साधारणपणे दर आठ ते नऊ वर्षांनी महिलांवरील अत्याचाराविरोधात एक मोठे जनआंदोलन उभे राहिलेले दिसते. या आंदोलनांनी केवळ रस्त्यावरची लढाई लढली नाही, तर देशाच्या कायदेशीर चौकटीतही मूलभूत बदल घडवून आणले. या संघर्षाची पाळेमुळे 'मथुरा' बलात्कार प्रकरणात आढळतात. पोलिस कोठडीत झालेल्या या अत्याचाराच्या प्रकरणात जेव्हा कनिष्ठ न्यायालयाने पोलिसांना निर्दोष सोडले, तेव्हा देशभरात संतापाची लाट उसळली. महिला संघटनांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाला हजारो पत्र पाठवून दाद मागण्यात आली. या अभूतपूर्व प्रतिसादानंतरच बलात्कारविरोधी कायद्यात सुधारणा करण्याची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सुरू झाली. असाच एक महत्त्वाचा लढा राजस्थानमधील भवरीदेवी यांच्या निमित्ताने उभा राहिला. बालविवाह थांबवण्याचे धाडसी प्रयत्न केल्यामुळे सूडबुद्धीने त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. मात्र, सामाजिक संघटनांच्या पाठबळामुळे भवरीदेवींनी खचून न जाता, अन्यायाविरोधातील एक जिवंत प्रतीक म्हणून स्वतःला झोकून दिले. त्यांच्या या जिद्दीने महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता देणाऱ्या कायद्यांचा पाया रचला. सन २०१२च्या डिसेंबर महिन्यात दिल्लीत घडलेल्या 'निर्भया' प्रकरणाने तर संपूर्ण देशाला हादरवून सोडले. एका चालत्या बसमध्ये झालेल्या अमानूष अत्याचाराने जनसामान्यांच्या भावनांचा बांध फुटला. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत मेणबत्त्या घेऊन निघालेले मोर्चे आणि पोलिसांच्या बॅरिकेट्सवर चढून तरुण पिढीने दिलेला लढा आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजला. दुर्दैवाने, दहा - अकरा दिवसांच्या संघर्षानंतर निर्भयाचा मृत्यू झाला, पण तिने पेटवलेली मशाल विझली नाही. या आंदोलनानंतर नियुक्त करण्यात आलेल्या जस्टिस वर्मा समितीच्या शिफारशींमुळे कायद्यात तीन महत्त्वाचे बदल झाले. पहिले म्हणजे, बलात्कार पीडित महिलेच्या वैद्यकीय तपासणीसाठी निश्चित प्रोटोकॉल तयार करण्यात आला. दुसरे, खून आणि बलात्कार अशा 'दुर्मिळातील दुर्मीळ' प्रकरणात फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आणि तिसरे म्हणजे, पीडितेची ओळख व नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्याचे कडक नियम लागू झाले. आज 'निर्भया' या नावाने अनेक नाटके आणि सामाजिक उपक्रम राबवले जातात. काही ठिकाणी या नावाचा वापर दुर्दैवाने मार्केटिंगसाठीही झाले, पण 'निर्भया' हे नाव आता केवळ एका व्यक्तीचे राहिले नसून ते अत्याचाराविरूद्धच्या धैर्याचे प्रतीक बनले आहे. आजही अनेक निर्भया आपल्या समाजात न्यायासाठी लढताना दिसतात. कायद्याचे नियम कडक झाले असले तरी आजही आरोपींना शिक्षा होईपर्यंत अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. 'नव्याने जन्मेन मी' म्हणणारी




निर्भया प्रत्येक आंदोलनाच्या रुपाने आपल्याला पुन्हा भेटत असते. प्रश्न फक्त एवढाच उरतो की, या आंदोलनांना यश मिळून महिलांवरील अत्याचारांचा हा सिलसिला नेमका कधी थांबणार? हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे.

## गुरु वचन

### गुण हीच महानता असते

एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्वतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले.

स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने महान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

## उपदेशकथा

### मान-अपमानाचा अभ्यास

परमाचार्यांचा एक शिष्य म्हैसूरच्या न्यायालयामध्ये मुख्य न्यायाधीश होता. गरिबीतून कष्ट करून जीवनात यशस्वी झालेला तो माणूस शंकराचा भक्त होता. ओम् नम: शिवाय या मंत्राचा पाच हजार जप केल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. त्याला ईश्वरदर्शनाची खरी ओढ होती. निवृत्त झाल्यावर तो आपल्या गुरूकडे गेला आणि आता मला ईश्वरदर्शनाचा मार्ग सांगा असे म्हणाला. गुरू म्हणाले, मी मोठा न्यायाधीश होतो हे आधी विसरा. ते विसरण्यास काय करायला हवे ते सांगा असे म्हटल्यावर गुरू म्हणाले, जेथे आपल्याला कोणी ओळखत नाही अशा ठिकाणी जाऊन भीक मागा. गुरू आज्ञेप्रमाणे तो न्यायाधीश घर सोडून द्वारकेला गेला. तेथे श्रीकृष्णाच्या मंदिरासमोर तो भिकारी लोकांच्या रांगेमध्ये बसून भीक मागू लागला. कमरेला एक पंचा, खांद्यावर एक टॉवेल व हातामध्ये एक पत्र्याचा डबा असा त्याचा अवतार होता. म्हैसूर सरकारचे गोपाळस्वामी नावाचे एक शिक्षणाधिकारी मे महिन्याच्या रजेमध्ये द्वारकेला गेले. श्रीकृष्णाच्या दर्शनाला जाताना त्यांनी या भिकाऱ्याला पाहिले. आपण या माणसाला कुठेतरी पाहिले आहे असे त्यांच्या मनात आले पण बरोबर आठवेना. बारा वाजता मंदिर बंद झाले व भिकारी उठून जाऊ लागले. गोपाळस्वामी त्या जज्जाच्या मागे गेले. जज्ज आपल्या खोलीवर गेला. खोलीचे कुलूप काढता काढताच गोपाळस्वामींनी ओळखले. नमस्कार करून त्यांना विचारले, हे असे का? जज्ज म्हणाला, माझ्या मनातील मोठेपणाची भावना नाहीशी करण्यासाठी गुरूने हे करायला सांगितले. मग ते साधले का असे विचारल्यावर जज्ज मी मोठा जज्ज होतो हे मी खरेच विसरलो. पण लोकांजवळ भीक मागताना अजून मला खऱ्या भिकाऱ्याची लाचारी येत नाही. मला पेन्शन आहे हे विसरणे कठीण जाते.

कथा उपदेश : व्यवहारात अहंभाव विसरणे कठीण असते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:चित्रा ११:१५:१९ |
| ७ मार्च २०२६ | योग:ध्रुव (अहोरात्र) |
| शनिवार | करण:बालव १९:१७:३० |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:कौलव (अहोरात्र) |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्- १९४७ | चन्द्र:तुला |
| संवत्सर - विश्वावसूनाम | हिजरी सन् - १४४५ |
| अयन- उत्तरायणारंभ | मुस्लिम मास - रमजान |
| मास- फाल्गुन | तारीख - १७ |
| ऋतु- सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | शुभ दिवस |
| तिथि:चतुर्थी १९:१७:३० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | | | |
| | | | | 3 | | 8 | | 9 |
| 9 | | 6 | | 7 | | 5 | | 2 |
| | 2 | 7 | 4 | | | | 6 | |
| | | 5 | 6 | | 7 | 2 | | |
| | 1 | | | | 8 | 7 | 5 | |
| 5 | | 2 | | 4 | | 6 | | 7 |
| 1 | | 3 | | 9 | | | | |
| | | | 5 | | | | | 3 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८७८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 8 | 5 | 9 | 3 | 7 | 4 | 6 | 1 |
| 9 | 4 | 6 | 2 | 5 | 1 | 3 | 7 | 8 |
| 7 | 1 | 3 | 4 | 8 | 6 | 2 | 5 | 9 |
| 5 | 9 | 4 | 8 | 1 | 2 | 7 | 3 | 6 |
| 6 | 7 | 2 | 5 | 9 | 3 | 8 | 1 | 4 |
| 1 | 3 | 8 | 6 | 7 | 4 | 5 | 9 | 2 |
| 3 | 2 | 7 | 1 | 6 | 8 | 9 | 4 | 5 |
| 4 | 5 | 1 | 3 | 2 | 9 | 6 | 8 | 7 |
| 8 | 6 | 9 | 7 | 4 | 5 | 1 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९८ - फ्रांसच्या सैन्याने रोमचा पाडाव केला व रोमन प्रजासत्ताकची स्थापना झाली.
- १७९९ - नेपोलियन बोनापार्टने पॅलेस्टाईनमधील जाफा शहर जिंकले. २,०० आल्बेनियन कैद्यांची कत्तल.
- १८१४ - नेपोलियन बोनापार्टने क्राओनची लढाई जिंकली.
- १८२७ - ब्राझिलच्या सैनिकांनी आर्जेन्टिनाच्या कार्मेन दि पॅटागोन्सच्या नाविक तळावर हल्ला केला परंतु स्थानिक नागरिकांनी त्यांना पळवून लावले.

### राष्ट्रीय

- १९८७ - भारतीय फलंदाज सुनिल गावस्कर कसोटी क्रिकेटमध्ये १०,००० धावा काढणारा पहिला फलंदाज बनला.
- २००८ - भारत-अमेरिका अणूकरारात महत्त्वाची भूमिका पार पाडणारे अणुउर्जा आयोगाचे अध्यक्ष अनिल काकोडकर यांना यंदाच्या 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.

### जन्म

- १८९ - पब्लियस सेप्टिमियस गेटा, रोमन सम्राट यांचा जन्म.
- १६९३ - पोप क्लेमेंट तेरावा यांचा जन्म.
- १७९२ - जॉन हर्षल, ईंग्लिश गणितज्ञ व अंतराळतज्ञ यांचा जन्म.
- १८५० - टोमास मासारिक, चेकोस्लोव्हेकियाचा पहिला राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ३२२ - ॲरिस्टोटल, ग्रीक तत्त्वज्ञ यांचे निधन.
- १६१ - ॲंटोनियस पायस, रोमन सम्राट यांचे निधन.
- १७२४ - पोप इनोसंट तेरावा यांचे निधन.
- १९५२ - परमहंस योगानंद, भारतीय तत्त्वज्ञ यांचे निधन.

## : SMS :

Life without u
is impossible,
u r in my breath
and blood.
i cant stay for a
second without u,
if u r not there
i am dead
oye hello i am
talking about
OXYGEN...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.२ | २२.६ |
| अहमदनगर | ३२.२ | २१.३ |
| अकोला | ३५.२ | २३.३ |
| अमरावती | ३४.६ | २२.७ |
| बीड | ३५.६ | २१.९ |
| भंडारा | ३५.३ | १९.९ |
| बुलढाणा | ३२.६ | १७ |
| चंद्रपूर | ३५.५ | २१.६ |
| चेन्नई | ३६.९ | २०.४ |
| नवी दिल्ली | ३३.६ | १९.३ |
| धुळे | ३३.४ | २३.४ |
| गोंदिया | ३३.६ | १८.६ |
| जळगाव | ३५.२ | २१.९ |
| कोल्हापूर | ३३.९ | २१.१ |
| लातूर | ३३.२ | २१.६ |
| मुंबई | ३६.७ | २७.५ |
| नागपूर | ३४.६ | २०.७ |
| नांदेड | ३५ | २२ |
| नंदूरबार | ३२.९ | २३.५ |
| नाशिक | ३३.७ | २१.१ |
| पुणे | ३२.७ | २१.१ |
| पंढरपूर | ३४.३ | २२.३ |
| सातारा | ३४ | २०.१ |
| सांगली | ३४.५ | २१.३ |
| सोलापूर | ३४.५ | २३.४ |
| वर्धा | ३५.५ | २२.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: उत्तर. मुलांच्या आरोग्याची चिंता मिटणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:उत्तर. नवीन योजना कार्यान्वयीत होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पश्चिम. व्यापारात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे आजचा दिवस धावपळीत जाणार आहे.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण. विचार पूर्वक काम केल्यास आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर. व्यवहार कुशलतेमुळे आधिकारी वर्गाकडून स्तुती होईल. आर्थिक लाभ मिळेल. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा : उत्तर. आपल्या बुद्धी चातुर्याने समस्या दूर होतील. सुख समृध्दीत वाढ होईल. उतावेळपणा करू नका. वाचनाची गोडी वाढेल.

**तुळ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पश्चिम. व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी,शुभ दिशा: उत्तर. मित्र, शुभचिंतकाची भेट होईल. आई वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. गृहपयोगी वस्तू खरेदी करण्याचे योग आहेत.


**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा :पश्चिम. वरिष्ठ लोकांमध्ये मान सन्मान मिळेल. बुद्धी चातुर्यामुळे कामात यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा: पश्चिम. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात लक्ष घालावे लागेल. नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** शुभ रंग : लाल,शुभ दिशा:उत्तर. अडकलेली कामे पूर्ण होण्याचे योग आहेत. मान प्रतिष्ठा सन्मान मिळणार आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा.

**मीन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण. व्यावसायीक किंवा कौटुंबिक समस्यांचे समाधान होईल. कौटुंबिक चिंता दूर होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७९



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '--- --- ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई, ३३. दिवस
३४. मध, ३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरुंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.फटफजिती ४.भारत श्रीलंका ९.कात ११.रसा १३.मन १४.केकवाली १६.फटकळ १७.रमणीय १९.नाक २०.पोकळ २१.करवत २३.साफ २४.तरु २६.साळ २७.वरचढ ३०.पावलोपावली ३२.धकधक ३४.माया ३५.साट ३६.तनमनधन ३८.काल ३९.सदा ४१.वदन ४२.गडप ४३.कनक ४५.हालहवाल ४७.घर ४८.डर ५०.कट ५१.कमानदार ५४.गो ५५.अनुवादक ५७.खडकाळ ५९.रावा ६०.कलम ६१.नगर ६३.मजल ६४.वासा ६५.भार ६६.क्षमा ६७.मळवट ६८.खानदान ७१.मादक ७२.कळ ७३.कासार ७५.दरडोई ७७.करकरीत ७९.भुईसपाट ८०.महिरप

उभे उत्तर : १.फटफटीत २.फटाकडी ३.तीर ५.रमणी ६.तनय ७.लंकेश्वर ८.काका १०.तडकफडक १२.सारक १५.वसंत १८.मळवली १९.नासा २०.पोळपाट २१.कढ २२.वर्ण २५.रुपाया २६.धडपड ३४.माफक ३७.मद ३८.काक ३९.सल ४०.दाहक ४४.नफानुकसान ४५.हाटक ४६.वामा ४९.रखवालदार ५०.कदम ५२.दाखला ५३.रड ५६.वाल ५८.काजळ ५९.राज ६१.नरमाई ६२.रक्षक ६३.मटका ६४.वाखाणणी ६७.मळकट ६९.दादला ७०.नर ७२.करपा ७४.साखर ७६.डोके ७७.कस ७८.तम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापौरांच्या पुढाकाराने सफाई कामगाराच्या मुलीच्या उपचाराचा मार्ग मोकळा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिका अंतर्गत वानवडी क्षेत्रीय कार्यालयातील गोसावी आरोग्य कोटी येथे कार्यरत कंत्राटी सेवक श्री. नितीन कमलापुरे यांच्या साडेतीन वर्षांच्या मुलीला कानाचा गंभीर आजार असल्याने तातडीने ऑपरेशन करणे आवश्यक होते. हे ऑपरेशन जर वयाच्या चार वर्षांच्या आत नाही केले तर कायमचा मूक बधिर पणा येऊ असे डॉक्टरांनी सांगितले. या उपचारासाठी सुमारे ३७ लाख रुपयांचा खर्च सांगितला होता. मात्र संबंधित ठेकेदाराकडून ईएसआय (ESI) कार्ड देण्यात आले नव्हते तसेच ईएसआयचे पैसेही भरले गेले नसल्यामुळे या उपचार प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले होते. ही बाब कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या निदर्शनास आल्यानंतर संघटनेने याबाबत पाठपुरावा केला. त्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी या प्रकरणात मध्यस्थी करत संबंधित विभागाला आवश्यक सूचना दिल्या. महापौरांच्या पुढाकारामुळे संबंधित कामगाराला ईएसआय कार्ड मिळाले असून त्यांच्या मुलीच्या उपचार व ऑपरेशनचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. शरद भाकरे व जनरल सेक्रेटरी श्री. मनीषभाई शेठ यांनी महापौर मंजुषा नागपुरे यांचे आभार मानले.



### महाराष्ट्र मुस्लिम फ्रंटच्यावतीने सर्व धर्मीय रोजा इफ्तार कार्यक्रम उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : पवित्र रमजान महिन्या निमित्त महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट या सामाजिक संघटनेच्या वतीने पुणे कॅम्प येथील बॉम्बे गॅरेज शेजारी विरवानी प्लाझा मध्ये सर्व धर्मीय रोजा इफ्तार कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या रोजा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट या सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नदीम मुजावर यांनी केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे,काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन दादा जोशी, काँग्रेसचे N.U.C.I प्रदेश माजी अध्यक्ष आमिर शेख,नगरसेवक रफिक शेख, अविनाश बागवे, प्राचीताई आल्हाट, अक्रम मदारी, राजेंद्रसिंह वालिया, खाजाभाई पठाण, इरफान शेख,महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट प्रदेश युवक अध्यक्ष नाहीद मुजावर, महबूब नदाफ, एजाज सय्यद, मुश्ताक जिक्रे, हमीद काझी, जाकलिन फॉरेस्ट, क्रिस्ति अण्णा, मोनी सिंग, अकबर सर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी समाजातील एकोपा बंधुता आणि शांततेचा संदेश देण्यात आला. उपस्थितांना खजूर, फळे, आणि विविध खाद्यपदार्थ देऊन रोजा सोडण्यात आला. त्यानंतर स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजन केले होते.

### नव्या 'पिच पिचक पिच' मोहिमेतून स्वच्छ आणि सुरक्षित होळीचा संदेश

पुणे (दैनिक संध्या) : होळी हा सण वर्षातून एकदाच येतो पण काही शहरांमध्ये त्याचा परिणाम वर्षभर दिसून येतो. आणि त्याचे कारण म्हणजे रंगांची केवळ मजा नाही तर सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ करणाऱ्या काही वाईट सवयी. रस्ते, भिंती, बसथांबे, बागा आणि मेट्रो स्थानके अनेकदा गुलालाने नव्हे तर पान आणि गुटख्याच्या पिंकांनी विद्रूप झालेली दिसतात. त्यामुळे शहरे आनंदी वाटण्याऐवजी अस्वच्छ आणि नकोशी वाटू लागतात. होळीचा खरा अर्थ म्हणजे रंग, आनंद आणि सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा केलेला सण. पण अलीकडे या सणाचे एक वेगळेच चित्र दिसू लागले आहे. काही लोकांच्या अस्वच्छ सवयींमुळे शहरातील जागा वर्षभर खराब राहतात. मुक्या प्राण्यांवर रंग फासून होळी खेळणे ही अत्यंत क्रूर गोष्ट आहे आणि ती थांबलीच पाहिजे. तसेच खूप मोठ्या आवाजात डीजे लावल्यामुळे संपूर्ण परिसरात त्रास होतो. याचा फटका वृद्ध, आजारी व्यक्ती आणि शांतता पसंत करणाऱ्यांना बसतो.

# २८ आणि २९ मार्चला महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार!

पुणे (दै. संध्या) :

- चौथ्या विजेतेपदासाठी भाग्यश्री फंड उत्सुक
- ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ४००हून अधिक खेळाडू सहभागी होणार




सोलापूर येथे दिनांक २८ आणि २९ मार्चला चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले जाणार असून निर्झरा केअर फाऊंडेशन, सोलापूर या संस्थेकडे स्पर्धेचे संयोजनपद देण्यात आले आहे. या स्पर्धेत ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ४००हून अधिक खेळाडू सहभागी होणार असून महिला महाराष्ट्र केसरी किताबासाठी भाग्यश्री फंड ही प्रमुख दावेदार आहे. यापूर्वी तिने तीन वेळा हा किताब जिंकला होता. निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक सौ. स्वाती अळ्ळीमोरे-साखरे, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, संघाचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

ही स्पर्धा सोलापूर जिल्ह्यातील सिद्धेश्वर पेठ परिसरात असलेल्या हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेसाठी ५० किलो, ५३ किलो, ५५ किलो, ५७ किलो, ५९ किलो, ६२ किलो, ६५ किलो, ६८ किलो, ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके दिली जाणार असून महाराष्ट्र केसरी किताब जिंकणाऱ्या महिला कुस्ती केलेला मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.

तीन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या भाग्यश्री हिच्यापुढे अमृता पुजारी, प्रगती गायकवाड, अंकिता फटाले, वेदांतिका पवार यांचे आव्हान असणार आहे. भाग्यश्रीने स्पेनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या २० वर्षांखालील गटाच्या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच थायलंडमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करीत विजेतेपद मिळवले होते.

"पुरुषाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची दरवर्षी महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात मोठी उत्सुकता असते. तशीच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धासुद्धा आपली छाप पाडते आहे. वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनच्या माध्यमातून चौथी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित केली आहे. मी आणि आमची संघटना या आयोजनासाठी त्यांच्या सर्वतोपरी पाठीशी असू. तसेच मी या स्पर्धेला आवर्जून हजेरी लावेन," असे केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. स्वाती यांचे वडील सिद्धाराम साखरे हे स्वतः ज्येष्ठ कुस्तीपटू, पोलीस अधिकारी व समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनची २०२३मध्ये स्थापना केली. स्वाती अळ्ळीमोरे-साखरे म्हणाल्या की, "सोलापूर जिल्ह्यामध्ये कुस्तीसाठी चांगले नैपुण्य आहे. मात्र अव्वल दर्जाच्या सुविधा, आखाडे व स्पर्धांचे व्यासपीठ याअभावी या खेळाडूंना अपेक्षेइतके आंतरराष्ट्रीय दर्जाचे करिअर करता येत नाही, हे लक्षात घेऊनच आम्ही निर्झरा फाउंडेशनतर्फे कुस्तीगिरांच्या विकासासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही ही महिलांची राज्य अजिंक्यपद स्पर्धा घेत आहोत."

या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव व कुस्तीगीर संघाचे खजिनदार संजय शेटे, राष्ट्रीय चॅम्पियन व कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीपआप्पा भोंडवे, हिंद केसरी व सरचिटणीस पै. योगेश दोडके, उपाध्यक्ष व आंतरराष्ट्रीय पंच छत्रपती पुरस्कार विजेते श्री. विलास कथुरे, उपाध्यक्ष श्री. हनुमंत गावडे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष श्री. मेघराज कटके, पुणे शहर राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष श्री. तात्यासाहेब भिंताडे, तांत्रिक समितीचे प्रमुख व आंतरराष्ट्रीय पंच श्री. दिनेश गुंड, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष व अमरावती महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. संजय तिरथकर, उद्योगपती श्री. सागर कत्ते, वस्ताद श्री. भरत मेकाले यांच्यासह महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे इतर पदाधिकारी, विविध जिल्हा कुस्तीगीर संघांचे पदाधिकारी तसेच स्थानिक नेते, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## 'आयसीएआय' पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए प्रणव आपटे यांची निवड

पुणे (दै. संध्या) :

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए प्रणव आपटे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सीए निलेश येवलेकर, सचिवपदी सीए नेहा फडके, खजिनदारपदी सीए नंदकुमार कदम यांची, तर 'विकासा' या विद्यार्थी शाखेच्या अध्यक्षपदी सीए सारिका दिंडोकार यांची निवड झाली आहे. २०२६-२०२७ या वर्षासाठी नव्या कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सीए प्रणव आपटे यांनी मावळते अध्यक्ष सीए सचिन मिणियार यांच्याकडून पदभार स्वीकारला. कार्यकारिणी सदस्य म्हणून सीए सचिन मिणियार, सीए हृषीकेश बडवे, सीए प्रितेश मुनोत, सीए प्रज्ञा बंब काम पाहतील. यावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए राजेश अग्रवाल, सीए रेखा धामणकर व सीए अभिषेक धामणे आदी उपस्थित होते. आयसीएआय पुणे शाखेच्या वतीने नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले. सीए सचिन मिणियार यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या कामांविषयी, राबविलेल्या योजनांविषयी माहिती दिली. राष्ट्रीय आणि विभागीय स्तरावर आयसीएआय पुणे शाखा आणि 'विकासा' विद्यार्थी शाखेला द्वितीय क्रमांकाचे प्रत्येकी दोन पारितोषिक मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सर्व सहकारी व कर्मचारी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## भांडगावच्या भक्तामर कलश तीर्थावर भव्य पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव

पुणे (दै. संध्या) :



दौंड तालुक्यातील भांडगाव (यवत) येथील भक्तामर कलश तीर्थ येथे ११ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत '१००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भक्तामर कलश तीर्थ परिसरात कलशाकार मंदिर, नवग्रह रत्नमय प्रतिमा, नद्यावर्तात १०८ आदिनाथ जिन प्रतिमा, भक्तामर ध्यान केंद्र व हीलिंग सेंटर, भक्तामर शास्त्र मानस्तंभ, महाद्वार, नवधा भक्ति भोजनालय, संत निवास व यात्रेकरू विश्रामालय, आरोग्य धाम (अस्पताल) तसेच पूजन साहित्य उपलब्ध करून देणारे भांडार अशा विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या महोत्सवाच्या यानिमित्ताने दिगंबर जैन राष्ट्रसंतांसह अनेक आचार्य, उपाध्याय, साधू-साध्वींचा

### दिगंबर जैन राष्ट्रसंतांचा दुर्मिळ समागम


दुर्मिळ संतसमागम येथे होणार आहे. महोत्सवात १२ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर ज्योतिष सम्मेलन', १४ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर हीलर महोत्सव' तसेच ४८००० मीटर हस्तलिखित भक्तामर वस्त्रांची विशेष झांकी सादर केली जाणार आहे. याशिवाय 'जैन अल्पसंख्याक योजना – सरकारी योजना आणि संधी' या विषयावर ऑल इंडिया जैन मायनॉरिटी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अमेरिकेतून पूर्वा सारंग शहा निर्मित भक्तामरवर चित्रफितीचे सादरीकरण होणार आहे. या महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राजू शेट्टी, आमदार राहुल कुल यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष निमंत्रण देण्यात आल्याची माहितीही यावेळी पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी पत्रकार परिषदेत श्री. किशोर जिनदत्त शहा (चंदूकाका सराफ), डॉ. सारंग शरद कुमार शहा, श्रीमती सुजाता निरंजन शहा, अ‍ॅड. डॉ. स्वप्निल महावीर शहा (पुणे), श्री मिलिंद फडे आणि श्री. चेतन शहा (बारामती), वीरकुमार शहा, सुरेंद्र बडजात्या उपस्थित होते. विश्व संत डॉ. आचार्य श्री प्रणाम सागर जी गुरुदेव यांच्या प्रेरणेने तसेच दीक्षा गुरु पूज्य आचार्य श्री पुष्पदंत सागर जी यांच्या आशीर्वादाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

## टीआरपी किंग' शरद केळकरचा २० वर्षांचा प्रवास; झी कुटुंब नॉमिनेशन पार्टीत खास सन्मान

पुणे (दै. संध्या) :

छोट्या पडद्यावर दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता शरद केळकर सध्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. 'टीआरपी किंग' म्हणून ओळख मिळालेल्या शरद केळकरचा २० वर्षांचा यशस्वी प्रवास नुकताच 'झी कुटुंब नॉमिनेशन पार्टी' या विशेष कार्यक्रमात साजरा करण्यात आला. हा रंगतदार सोहळा येत्या रविवारी, ८ मार्च रोजी झी टीव्ही वर प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

या खास कार्यक्रमात संपूर्ण झी कुटुंब एकत्र येत विविध मनोरंजक खेळ, धमाल गप्पा, रंगतदार नृत्य सादरीकरणे आणि खास परफॉर्मन्समधून प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करताना दिसणार आहे. 'वसुधा', 'सरू', 'गंगा माई की बेटियां', 'जगद्धात्री', 'लक्ष्मी निवास', 'जाने अनजाने हम मिले', 'तुम से तुम तक' आणि 'जागृति' या मालिकांतील कलाकार या कार्यक्रमात एकाच मंचावर झळकणार आहेत. कार्यक्रमात अनेक मजेशीर क्षण पाहायला मिळणार आहेत. 'जाने अनजाने हम मिले' मधील शारदा बुआ आणि 'वसुधा'मधील सारिका यांनी झी कुटुंबातील कलाकारांना 'परफेक्ट व्हिलन' कसे व्हायचे याचे मजेदार धडे दिले. तसेच अनु–आर्य यांचा रोमँटिक डान्स प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणार आहे. याशिवाय सर्व कलाकारांनी एकत्र खेळलेला डान्स गेम कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवणार आहे. मात्र या सोहळ्यातील सर्वात खास क्षण ठरला तो म्हणजे सूत्रसंचालक जय सोनी यांनी शरद केळकरला मंचावर बोलावून त्याला "टीआरपी किंग" म्हणून गौरविल्याचा. झी टीव्हीवरील त्याच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीबद्दल त्याचा विशेष सन्मान करण्यात आला. शरद केळकरचा छोट्या पडद्यावरील प्रवासही तितकाच प्रेरणादायी आहे. २००५ साली त्याने सात फेरे – सलोनी का सफर या लोकप्रिय मालिकेतून प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवले. त्या काळात ही मालिका टीआरपीच्या शिखरावर होती. आज दोन दशकांनंतरही त्याची लोकप्रियता कायम असून सध्या तुम से तुम तक ही त्याची मालिका टीआरपी यादीत आघाडीवर आहे. शरदच्या या प्रवासाबद्दल बोलताना जय सोनी म्हणाला, "टीआरपी चार्टवर राज्य करणारे कलाकार फार थोडे असतात. वीस वर्षांपूर्वी तू टीआरपी किंग होतास आणि आजही तू त्याच ताकदीने टीआरपी चार्टवर अग्रस्थानी आहेस. प्रत्येक अर्थाने तू खरा 'टीआरपी किंग' आहेस."



# चेतेश्वर पुजारा आणि मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमीचे उद्‌घाटन

पुणे (दै. संध्या) :



समावेशक क्रीडा विकास आणि सामुदायिक उन्नतीसाठी सामायिक वचनबद्धतेला बळकटी देत, एएसके फाउंडेशन२४ आणि एसएमएल या संस्था एकमेकांचे भागीदारीत एकत्रित प्रयत्न करणार आहेत.

पुण्यातील शिंदे हायस्कूल ग्राउंड येथे स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमीचे उद्‌घाटन करण्यात आले. मजबूत सीएसआर दृष्टिकोनातून, या उपक्रमाचे उद्दिष्ट तरुण क्रिकेटपटूंना, विशेषतः वंचित पार्श्वभूमीतील मुलांना, संरचित प्रशिक्षण, व्यावसायिक मार्गदर्शन आणि दर्जेदार क्रीडा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांचे संगोपन करणे या हेतूनेच या संस्था एकत्रित आल्या आहेत

एसएमएलच्या सीएसआर प्रवासात हा शुभारंभ एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जो एएसके फाउंडेशन२४ सोबतच्या सहकार्याने हाती घेण्यात आला आहे. तळागाळातील क्रीडा विकासात संसाधने आणि समर्थन देऊन, एसएमएल अशा मुलांसाठी समान संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवते. अन्यथा व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी मिळू शकत नाही. समग्र बाल विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी ओळखले जाणारे एएसके फाउंडेशन२४, पात्र तरुण प्रतिभावान खेळाडू ओळखण्यात आणि त्यांना पाठिंबा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आर्थिक किंवा सामाजिक अडथळे निर्माण झाले तरी त्यावर मात करून त्यांच्या क्षमतेला मर्यादित करू नयेत याची खात्री करते. या कार्यक्रमाला एक सखोल अर्थ देत, आजूबाजूच्या समुदायातील शेतकऱ्यांची मुले कार्यक्रमाच्या दिवशी मैदानावर उतरतील आणि एक टी-१० सामना खेळतील. हा सामना म्हणजे अकादमी ज्या समावेशकतेची आणि संधीची भावना दर्शवते त्याचे प्रतीक आहे. मैदानावरील त्यांची उपस्थिती उपक्रमाच्या मूळ विश्वासाचे प्रतिबिंबित करते, की प्रतिभा सर्वत्र असते आणि योग्य पाठिंब्याने, प्रत्येक मुलाला खेळण्याची, स्पर्धा करण्याची आणि स्वप्न पाहण्याची संधी मिळण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. उद्‌घाटन समारंभाला ज्येष्ठ क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ, तसेच बी.बी. पाटील, आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू केदार जाधव, अवनी शंतनू अगस्ती, श्री शंतनू अगस्ती, बिमल शाह, श्री.रेड्डी, श्री. माने, अभिषेक बोके, आनंद याल्विगी आणि रोहित शर्मा सारख्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंना मार्गदर्शन करणारे द्रोणाचार्य पुरस्कार विजेते प्रशिक्षक श्री दिनेश लाड आदी प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. स्पिन अँड स्विंगचे संस्थापक आणि सीईओ आनंद याल्विगी म्हणाले, "स्पिन अँड स्विंग ही संस्था या विश्वासावर आधारित आहे की क्रीडा क्षेत्र हे तरुणांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारी शक्ती असू शकते. या अकादमीच्या माध्यमातून, आम्ही केवळ क्रिकेटपटूंना प्रशिक्षण देण्याचेच नाही तर शिस्त, चिकाटी आणि टीमवर्क यासारख्या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवतो. विविध पार्श्वभूमीतील मुले त्यांच्या आवडीचा पाठलाग करू शकतील आणि त्यांची पूर्ण क्षमता उलगडू शकतील अशा संरचित मार्गदर्शन, जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि समावेशक वातावरण प्रदान करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. आजचा कार्यक्रम क्रीडा उत्कृष्टतेला सामाजिक जबाबदारीशी जोडणारी दीर्घकालीन परिसंस्था तयार करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे."

ए ए एस के फाउंडेशन२४ चे संस्थापक अवनी शांतनु अगस्ती पुढे म्हणाले, " आम्ही नेहमीच सर्वांगीण विकासाद्वारे मुलांना सक्षम बनवण्यावर विश्वास ठेवला आहे आणि या प्रवासात खेळ महत्त्वाची भूमिका बजावतात. स्पिन अँड स्विंग आणि एस एम एल सोबत सहयोग केल्याने आम्हाला आमचा प्रभाव वाढवता येतो, तरुण प्रतिभेला योग्य मार्गदर्शन, पायाभूत सुविधा आणि उत्कृष्टतेसाठी प्रोत्साहन मिळते याची खात्री होते. ही अकादमी केवळ क्रिकेट प्रशिक्षण केंद्रापेक्षा जास्त आहे; ही एक सुरक्षित जागा आहे जिथे मुले आत्मविश्वास निर्माण करू शकतात, जीवन कौशल्ये शिकू शकतात आणि मोठी स्वप्ने पाहू शकतात. अशा प्रकारचे उपक्रम शाश्वत समुदाय विकासाचे आमचे ध्येय मजबूत करतात आणि पुढील पिढीतील बदल घडवून आणण्याचे काम करतात."

एसएमएलचे व्यवस्थापकीय संचालक बिमल शाह म्हणाले, "नवोपक्रम, वाढ आणि सामाजिक जबाबदारी यांचा मेळ घालणाऱ्या उपक्रमांना पाठिंबा देणे हे एसएमएलच्या दृष्टिकोनाचे गाभा आहे. स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमी एक अद्वितीय व्यासपीठ आहे. जिथे व्यवसाय, समुदाय आणि खेळ अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्यासाठी एकमेकांना जोडतात. तरुण क्रिकेटपटूंना सक्षम बनवून, आम्ही सामाजिक विकासाला चालना देत असताना खेळाच्या भविष्यात योगदान देत आहोत. अशा सहकार्यांमुळे कौशल्य, संसाधने आणि आवड एकत्र येते जेणेकरून अशा मुलांसाठी संधी निर्माण होतील ज्यांना अन्यथा संरचित क्रीडा प्रशिक्षणाची संधी मिळू शकत नाही." ज्येष्ठ क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा म्हणाले, "तरुण क्रिकेटपटूंसाठी संधी निर्माण करण्यासाठी या संस्था एकत्र येत आहेत हे पाहणे खरोखर प्रेरणादायी आहे. या अकादमीसारखे व्यासपीठ केवळ जागतिक दर्जाचे प्रशिक्षणच देत नाही तर शिस्त, टीमवर्क आणि लवचिकता यासारखे आवश्यक जीवन धडे देखील शिकवते. क्रिकेट हे केवळ खेळापुरते मर्यादित नसून चारित्र्य आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे माध्यम आहे. या प्रवासाचा भाग बनण्यास, माझे अनुभव शेअर करण्यास आणि या तरुण प्रतिभांना उच्च ध्येय ठेवण्यासाठी, कठोर परिश्रम करण्यास आणि उत्कटतेने आणि सचोटीने खेळाच्या भावनेला स्वीकारण्यास प्रोत्साहित करण्यास मी उत्सुक आहे." दिनांक २ मार्च २०२६ पासून, अकादमी संरचित प्रशिक्षण मॉड्यूल, मार्गदर्शन कार्यक्रम आणि स्पर्धात्मक अनुभव सुरू करेल. वंचित समुदायांमधील निवडक मुलांना एस एम एल आणि ए एस के फाउंडेशन२४ द्वारे सुलभ केलेल्या सी एस आर फ्रेमवर्क अंतर्गत समर्थित प्रशिक्षण मिळेल ज्यामध्ये कोचिंग प्रवेश, उपकरणे आणि संरचित विकास मार्गांचा समावेश असेल.

पुण्यापलीकडे, हा उपक्रम पुजारा अकादमीच्या सहकार्याने राजकोट आणि माटुंगा जिमखाना येथे विस्तारित केला जाईल, तसेच पंजाब, तेलंगणा आणि तामिळनाडूमध्ये पुढील योजना आखल्या जातील. टप्प्याटप्प्याने होणारा हा विस्तार दीर्घकालीन दृष्टिकोन प्रतिबिंबित करतो: समावेशक, शाश्वत आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार असलेली एक मजबूत तळागाळातील क्रिकेट परिसंस्था तयार करणे.

केवळ क्रिकेट प्रशिक्षण केंद्रापेक्षाही अधिक, स्पिन अँड स्विंग क्रिकेट अकादमी समान संधी, युवा सक्षमीकरण आणि खेळ समुदायांमध्ये परिवर्तन घडवू शकतो या विश्वासाची वचनबद्धता दर्शवते. तळागाळातील विकासाशी कॉर्पोरेट जबाबदारीचे संरेखन करून, ही भागीदारी अशा मार्ग तयार करण्यास मदत करत आहे जिथे प्रतिभेला संधी मिळते आणि स्वप्नांना दिशा मिळते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ओबेन इलेक्ट्रिकची रॉर ईझी सिग्मावर फेस्टिव्ह ऑफर




पुणे (दैनिक संध्या) : भारतातील सर्वात वेगाने वाढणारी संशोधन-विकास आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनी ओबेन इलेक्ट्रिकने गुढी पाडव्याच्या निमित्ताने आपल्या फ्लॅगशिप इलेक्ट्रिक मोटरसायकल रॉर ईझी सिग्मावर विशेष उत्सवी ऑफर जाहीर केली आहे. मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असलेली ही ऑफर ग्राहकांना नववर्षाची शुभ सुरुवात स्मार्ट, उच्च कार्यक्षम आणि शाश्वत मोबिलिटी पर्यायासह करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानासह अर्थपूर्ण बचत देत हा सण अधिक खास करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. या उत्सवी ऑफरअंतर्गत ग्राहकांना एकूण ३७,००० रुपयापर्यंतचे लाभ मिळू शकतात. रॉर ईझी सिग्मा आता १,०९,९९९ रुपयांपासून उपलब्ध आहे. विशेष उत्सवी किमतीसोबतच ग्राहकांना मोफत ५ वर्षे / ६०,००० किमी विस्तारित वॉरंटी तसेच अनलिमिटेड डेटा सहित १ वर्षाची मोफत ओबेन कनेक्ट ॲप सबस्क्रिप्शन दिली जाणार आहे. प्रगत तंत्रज्ञान, उत्कृष्ट मालकी मूल्य आणि स्पर्धात्मक उत्सवी किंमत यांचा संगम साधत इलेक्ट्रिक मोबिलिटीचा स्वीकार अधिक वेगाने वाढवण्याच्या ओबेन इलेक्ट्रिकच्या बांधिलकीला या उपक्रमामुळे अधिक बळ मिळते. कंपनीने आपल्या रिटेल आणि सर्व्हिस नेटवर्कचा सातत्याने विस्तार केला असून सध्या ती १८ राज्यांमधील ८० पेक्षा अधिक शहरांमध्ये ९० पेक्षा अधिक शोरूम्स चालवते. याशिवाय ओबेन इलेक्ट्रिकची उत्पादने ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट सारख्या अग्रगण्य ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरही उपलब्ध आहेत.

# रुग्ण हक्क परिषदेचा शिवसन्मान पुरस्कार प्रेरणादायी

## भानुप्रताप बर्गे यांचे मत; शिवजयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'शिवसन्मान पुरस्कार' प्रदान



पुणे (दै. संध्या) :

तळागाळात काम करणाऱ्या, गरिबांची मदत करणाऱ्या, निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या मान्यवरांचा रुग्ण हक्क परिषद दरवर्षी शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करते. रुग्ण हक्क परिषदेचा हा शिवसन्मान पुरस्कार अनेकांना समाजकार्यासाठी प्रेरणा देणारा आहे, असे मत माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त लालमहल येथे आयोजिलेल्या शिवसन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात भानुप्रताप बर्गे बोलत होते. प्रसंगी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, माजी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, सह्याद्री हॉस्पिटलचे उपाध्यक्ष सचिन कुलकर्णी, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक भारत देसडला, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे मुख्य अधीक्षक डॉ. हनुमंत चव्हाण, राजाभाऊ कदम, लहुजी शक्ती सेनेचे अमोल चव्हाण, गोविंद साठे आदी उपस्थित होते.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने या सोहळ्यात उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक, राजकीय, विधी व न्याय तसेच क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०१ मान्यवरांचा लाल महल येथे शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मानचिन्ह, पुस्तक, उपरणे आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यामध्ये अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कोषाध्यक्ष अनिल गुंजाळ, माजी शासकीय अधिकारी देवेंद्र दलाल, युवा पत्रकार राधिका वळसे पाटील, सज्जद सय्यद, अनिल खुडे, लक्ष्मण साबळे, दलित पँथरच्या प्रदेशाध्यक्ष स्नेहा माने, ह.भ.प. विष्णु महाराज चामनर, हरजीवन हॉस्पिटलचे डॉ. सागर रोकडे, आदर्श शिक्षिका राखी रासकर, गायिका शिल्पा पांचाळ, नगरसेवक निलेश आल्हाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संजय भंडारे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे शासकीय अधिकारी शितल फत्तेपुरे, समर्थ सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते शिवराज माळवदकर, तृतीयपंथी कार्यकर्त्या प्रीती लाटे, भाकर फाउंडेशन मुंबईचे ॲड. दीपक सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील १०१ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

उमेश चव्हाण म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आणि न्यायासाठी दिलेली प्रेरणा समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्याच विचारातून रुग्ण हक्क परिषद आरोग्य क्षेत्रात सर्वसामान्यांना न्याय मिळावा यासाठी सातत्याने काम करत आहे. समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व्यक्तींना शिवसन्मान पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा उद्देश असून, यामुळे समाजातील इतरांनाही प्रेरणा मिळते." समाजासाठी सकारात्मक काम करणाऱ्या व्यक्तींना अशा प्रकारे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी, यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसन्मान पुरस्काराचे आयोजन रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्ष अपर्णा मारणे साठ्ये यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित राजे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. मंदार सावजी यांनी केले.


## ग्रामपंचायत झेंडेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत झेंडेवाडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत झेंडेवाडी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक ०७/०३/२०२६ ते दिनांक १४/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाऊस पाणी संकलन यंत्रणा बसवणे. | २७६३५६/- | दि. ०७/०३/२०२६ ते दि. १४/०३/२०२६ | २३६/- | २७६४/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत झेंडेवाडी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र 006002500000213 वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३.जि.प. रजिस्ट्रेशन, PAN कार्ड, GST certificate व या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत झेंडेवाडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत झेंडेवाडी ता पुरंदर जि पुणे

## ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी ता. पुरंदर जि.पुणे यांच्याकडुन दिनांक ०७/०३/२०२५ ते दिनांक १४/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक ०७/०३/२०२५ ते दिनांक १४/०३/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | एखतपूर जि.प. शाळा येथे शौचालय बांधणे. | २९९९८८/- | दिनांक ०७/०३/२०२६ ते दिनांक ४/०३/२०२६ | २३६/- | ३०००/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००१११ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५०००००१११ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत एखतपूर/मुंजवडी ता. पुरंदर जि. पुणे


## प्रथम पुण्यस्मरणानिमित्त संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

आळंदी (दै. संध्या) :

वारकरी परंपरेचा सुगंध लाभलेल्या आळंदी नगरीतील आळंदी देवाची वि.वि.का. सोसायटीच्या माजी चेअरमन गं.भा. विमल (काकू) गोपाळ पाटील कुऱ्हाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य 'संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा' सोमवार दि.९ मार्च ते सोमवार दि.१६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. भक्तिभाव, ज्ञान आणि नामसंकीर्तनाच्या मंगल वातावरणात हा सोहळा पार पडणार असून भागवताचार्य ह.भ.प. सिद्राम महाराज काळे यांच्या रसाळ वाणीतील कथामृताचा लाभ भाविकांना मिळणार असल्याचे ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे विश्वस्त योगेंद्र कुऱ्हाडे यांनी सांगितले. कथामालेची सुरुवात 'श्रीमद्भागवत महात्म्य' व 'सृष्टी वर्णन' या विषयांनी होणार असून वराह अवतार, कपील अवतार, भक्त ध्रुव, जडभरत, प्रल्हाद चरित्र, वामन अवतार, श्रीराम जन्म, श्रीकृष्ण जन्म, कृष्ण बाललीला, गोवर्धन पूजा, कंसवध ते परीक्षित मोक्ष आणि कलीयुगातील भागवत महात्म्य अशा विविध अध्यायांवर प्रवचन होणार आहे. दररोज सकाळी ९ ते ११.३० व सायंकाळी ६ ते ८.३० या वेळेत कथा होईल, तर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ होणार आहे.

# कोकणातील आंबा-काजू बागायतीचे मोठे नुकसान

## हेक्टरी ५० हजार मदतीची आ. शेखर निकम यांची मागणी

मुंबई (दै. संध्या) :

कोकणातील विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा व काजू बागायतीचे यंदा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून बागायतदारांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी आमदार शेखर निकम यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करून केली. तसेच आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आंबा निर्यातीत निर्माण झालेल्या अडचणींबाबतही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

आ. निकम यांनी सांगितले की, रत्नागिरी जिल्ह्यात जवळपास ९९ टक्के आंबा आणि काजू उत्पादनावर परिणाम झाला आहे. वाढलेली उष्णता, परागीकरणासाठी मधमाशांची घटती संख्या तसेच लोटे व खेड परिसरातील रासायनिक कंपन्यांमुळे निर्माण होणारे पर्यावरणीय परिणाम या विविध कारणांमुळे बागायतीवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पीकविमा घेतलेला नसल्याने त्यांना विमा भरपाई मिळणार नाही. त्यामुळे सर्व बागायतदारांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच आंबा निर्यातीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, कोकणातील आंबा मोठ्या प्रमाणावर दुबईसह आखाती देशांमध्ये निर्यात केला




जातो. मात्र सध्या सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यातीमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. पर्याय म्हणून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि कॅनडा या देशांमध्ये आंबा निर्यात करण्याचा विचार केला जात असला तरी विमान प्रवासाचे वाढलेले तिकीट दर शेतकऱ्यांसाठी परवडणारे नाहीत. त्यामुळे या तिकीट दरांबाबत शासनाने विशेष सवलत देण्याचा विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली. याशिवाय १६ फेब्रुवारी २०२३ रोजी कृषी विभागाने काजू विकासासाठी काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी कधी होणार, असा सवालही आ. निकम यांनी उपस्थित केला.

# विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

कोरेगावमुळ (दै. संध्या) :

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करणारा दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प 'व्हिजन डॉक्युमेंट'च्या प्रभावी अंमलबजावणीस चालना देणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले.



यंदाचा अर्थसंकल्प अजितदादा पवार यांना समर्पित केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत, दादांचे उचित स्मारक उभारण्याबरोबरच त्यांच्या नावाने 'गतिमान नागरी सेवा पुरस्कार' सुरू करण्याची घोषणा ही त्यांना दिलेली योग्य श्रद्धांजली असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या. प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार प्रमुख आधारस्तंभांवर राज्याच्या विकासाची दिशा या अर्थसंकल्पातून स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे त्यांनी नमूद केले. कृषी क्षेत्राला बळकटी देणे, पायाभूत सुविधा मजबूत करणे तसेच पर्यटन, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. भांडवली खर्चात सुमारे २० टक्क्यांची वाढ केल्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि महाराष्ट्र देशातील अग्रगण्य अर्थव्यवस्था म्हणून अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दिव्यांग बांधवांसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एक टक्का निधी राखून ठेवण्याचा निर्णय हा अजितदादा पवार यांच्या संवेदनशील विचारांचे प्रतिबिंब असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच वढू-तुळापूर येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळाचे स्मारक, साताऱ्यातील अजिंक्यतारा किल्ला आणि संगम माहुली विकास आराखड्यासाठी विशेष तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण' योजनेसाठी भरीव निधी, एकल महिलांसाठी कल्याणकारी धोरण आणि 'लखपती दीदी' उपक्रमाद्वारे महिलांना स्वावलंबी बनविण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापर वाढविण्यासाठीही अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. मुंबईच्या धर्तीवर पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे ग्रोथ हब उभारण्याची योजना, अमृतकालीन रस्ते विकास योजना आणि मेट्रो प्रकल्पांद्वारे पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बीड जिल्ह्यात आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे नव्या इमारतीसाठी बृहद आराखडा तयार करण्यात येणार असून बीड जिल्हा रुग्णालयासाठी ३६० खाटांचे नवे रुग्णालय, नर्सिंग कॉलेज आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती त्यांनी दिली.

# १० मार्चला पुण्यात राष्ट्रव्यापी धरणे आंदोलन




पुणे (दै. संध्या) :

गया (बिहार) येथील ऐतिहासिक 'महाबोधी महाविहाराचे' व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध धम्मियांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीसाठी पुणे परिसरातील भिक्खू संघातर्फे राष्ट्रव्यापी धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आंदोलन १० मार्च २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान (जिल्हाधिकारी कार्यालयासमोर), पुणे येथे पार पडणार आहे. अशी माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला या आंदोलनाचे समन्वयक भंते नागघोष महाथेरो, भंते धम्मानंद, भंते पंय्यारखित, भंते संचितबोधी, भंते मिलिंद उपस्थित होते.

आंदोलनाची पार्श्वभूमी आणि मुख्य मागण्या : ऐतिहासिक वारसा: तथागत भगवान गौतम बुद्ध यांना ज्या ठिकाणी ज्ञान प्राप्त झाले, त्या गया येथील महाबोधी महाविहाराची निर्मिती चक्रवर्ती सम्राट अशोकाने केली होती.

व्यवस्थापनाचा प्रश्न: हजारो वर्षांचा बौद्ध वारसा असूनही, या विहाराचे व्यवस्थापन सध्या बौद्धेतर व्यक्तींच्या (विशेषतः ब्राह्मण धर्मपंडितांच्या) ताब्यात आहे. हे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध अनुयायांच्या देखरेखीखाली असावे, अशी जगभरातील बौद्ध बांधवांची आग्रही मागणी आहे.

एकजुटीचे आवाहन: भगवान बुद्धांचा धम्म आणि वारसा जतन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे मानून देशभरातील बौद्ध समाज शहर, जिल्हा आणि तालुका स्तरावर संघटित होऊन हे आंदोलन करत आहे.

या आंदोलनास सर्व राजकीय पक्ष, राजकीय नेते, बौद्धेतर धर्म प्रतिनिधी आणि विद्वान व्यक्तींचा पाठिंबा मिळवण्यासाठी आणि व्यापक सहमती निर्माण करण्यासाठी 'महाबोधी महाविहार धरणे आंदोलन' आयोजित करण्यात येत आहे.

पुणे परिसरातील सर्व धम्मप्रेमी आणि न्यायप्रिय नागरिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन 'पुणे परिसरातील भिक्खू संघ' या निमंत्रक संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

भारती एअरटेल फाउंडेशन आणि CK-12 फाउंडेशन यांनी शिक्षक सक्षमीकरणासाठी

# सर्वात व्यापक AI-एकत्रीकरण उपक्रमाचा प्रारंभ केला

- TheTeacherApp मध्ये 45+ AI-सक्षम साधनांचे एकत्रीकरण; देशभरातील 2 लाखांहून अधिक शिक्षकांपर्यंत पोहोच
- K–12 स्तरावरील सर्व शिक्षकांसाठी आणि संपूर्ण शालेय शिक्षण व्यवस्थेसाठी AI-सक्षम साधने उपलब्ध करून TheTeacherApp ला पुढील टप्प्यावर नेले
- शिक्षकांना सशक्त करत, समावेशक आणि भविष्यासाठी सज्ज शिक्षणाच्या भारताच्या दीर्घकालीन दृष्टीकोनाला तंत्रज्ञानाद्वारे पाठबळ

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारताच्या शिक्षण परिसंस्थेत AI चा स्वीकार वेगाने वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, भारती एअरटेल फाउंडेशनने जागतिक स्तरावरील ना-नफा संस्थेच्या CK-12 फाउंडेशनसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत, K–12 स्तरावरील सर्व शिक्षकांसाठी 45 पेक्षा अधिक AI-सक्षम अध्यापन साधनांचे TheTeacherApp मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे. सध्या देशभरातील 2 लाखांहून अधिक शिक्षक वापरत असलेले TheTeacherApp हे आयुष्यभर मोफत असलेले डिजिटल शिक्षण व्यासपीठ आहे. वर्गखोलीतील प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले AI-सक्षम TheTeacherApp शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापन प्रक्रियेला पाठबळ देत, वेळ वाचवणे, अध्यापन अधिक प्रभावी करणे आणि भारताच्या विकसित होत असलेल्या शिक्षण व्यवस्थेशी सुसंगत, सुरक्षित व संदर्भानुरूप साधनांद्वारे विविध अध्यापन गरजांना प्रतिसाद देणे शक्य करते. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 आणि विकसित भारत 2047 या दृष्टीकोनावर आधारित ही भागीदारी शिक्षकांसाठी केवळ डिजिटल प्रवेशापासून अर्थपूर्ण डिजिटल सहभागाकडे वाटचाल दर्शवते. TheTeacherApp दीर्घकाळापासून प्रशिक्षण व शिक्षण संसाधनांच्या माध्यमातून शिक्षकांना पाठबळ देत आहे. त्याच्या नव्या AI-सक्षम आवृत्तीत अध्यापन कार्यप्रवाहात थेट सहाय्यक स्तर समाविष्ट करण्यात आला असून, प्रत्यक्ष वर्गखोलीशी सुसंगत तत्काळ मदत तसेच सर्व इयत्ता आणि सर्व विषयांतील संबंधित मजकुराला सहज प्रवेश उपलब्ध करून दिला जातो.

या प्रसंगी बोलताना भारताचे शिक्षण मंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले,"राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 ने शिक्षण व्यवस्थेतील परिवर्तनासाठी स्पष्ट दिशादर्शक दिला आहे आणि प्रत्येक टप्प्यावर शिक्षकांना पाठबळ देणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रत्येक इयत्तेतील आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या विविध गरजांना पूरक अशी दर्जेदार संसाधने शिक्षकांसाठी अत्यावश्यक आहेत आणि आज AI ही लक्झरी राहिलेली नसून ती गरज बनली आहे. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे हे उपक्रम परिवर्तनकारी ठरतात. 2024 मध्ये TheTeacherApp च्या उद्घाटनावेळी सहभागी झाल्याचा मला अभिमान आहे आणि आज भारतभरातील वर्गखोल्यांमध्ये AI च्या एकत्रीकरणाला पाठबळ देणारा हा पुढचा टप्पा पाहणे प्रेरणादायी आहे." या भागीदारीविषयी बोलताना भारती एंटरप्रायझेसचे उपाध्यक्ष आणि भारती एअरटेल फाउंडेशनचे सह-अध्यक्ष श्री. राकेश भारती मित्तल म्हणाले, "शिक्षक हे भारताच्या भविष्यातील शिल्पकार आहेत आणि NEP 2020 ने शिक्षण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी त्यांना योग्य स्थान दिले आहे. 2024 मध्ये सुरू झाल्यापासून केवळ 15 महिन्यांत TheTeacherApp ने 2 लाखांहून अधिक शिक्षकांना जोडले असून, शेकडो तासांचे दर्जेदार शैक्षणिक साहित्य आणि शिकण्याचे अनुभव उपलब्ध करून दिले आहेत. यावरून शिक्षकांमध्ये सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाची तीव्र गरज स्पष्ट होते. आज CK-12 सोबतच्या सहकार्यामुळे आम्ही बुद्धिमान वर्गखोली संसाधने अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट करत शिक्षकांच्या साधनसंचाचा विस्तार करत आहोत, ज्यामुळे तयारीसाठी कमी वेळ आणि विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी अधिक वेळ देता येईल.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

१. मौजे भटकळवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे, खालीलप्रमाणे हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती

| अनु. क्रं. | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे—आर—चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | १२७ | १० | ०—१६—०० | ०.७३ |
| २ | १२५ | ४/ब | ०—३७—०० | १.०० |
| ३ | १२५ | ६/अ | ०—००—६७ | ०.०२ |
| ४ | १२५ | ६/ड | ०—१२—०० | ०.३४ |
| ५ | १२६ | ५/अ | ०—०६—०० पोट खराबा ०—०१—०० | ०.२८ |
| ६ | १२६ | ८ | ०—२१—०० | ०.८१ |
| ७ | १२६ | ९ | ०—६०—०० | २.१३ |
| ८ | १२७ | २ | ०—०२—०० | ०.०८ |
| ९ | १२७ | ४ | ०—१७—०० | ०.२८ |
| १० | १२७ | ९/अ | ०—२०—०० | ०.७७ |
| ११ | १५७ | २ | ०—०५—०० | ०.२५ |
| १२ | १५९ | १२/अ | ०—१३—४० | ०.९३ |
| १३ | २०८ | १ | ०—३६—०० पोट खराबा ०—०१—०० | ०.६२ |
| १४ | १५९ | १ | ०—०२—०० | ०.११ |
| १५ | १२६ | २/अ | ०—०३—०० | ०.०७ |
| १६ | १२६ | १० | ०—०१—०० | ०.०३ |

वरीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती तदंगभुत सर्व हक्कहितसंबंधा सुध्दा दरोबस्त.

२. वर वर्णन केलेल्या जमिनीं मध्ये आमच्या अशिल श्रीमती अलका बाजीराव लेंडे, श्री. संदिप बाजीराव लेंडे आणि श्री. संदेश बाजीराव लेंडे, रा. मु. भटकळवाडी-काचळेमळा, पो. पिंपळवडी, ता. जुन्नर, जि. पुणे, यांचा अविभक्त समाईक मालकी हक्क अगर हिस्सा आहे. सदर जमीन मिळकतीच्या ७/१२ दप्तरी माझा अशिलांचे आणि सदर जमीन मिळकतीच्या सह हिस्सेदाराच्या नावाची नोंद आहे. तरी सदर जमीन मिळकतीचे आजतागायत माझे अशिल आणि सदर जमीन मिळकतीतील इतर सह हिस्सेदार यांच्यात सरस निरस वाटप झालेले नाही.

३. सदर जमिनी बाबत सदरहू जमीन मिळकतीच्या माझा अशिला व्यतीरिक्त इतर सह हिस्सेदारासोबत कोणीही कोणत्याही व कसल्याही प्रकारचा व्यवहार आमचे अशिलांचे संमती शिवाय करू नये, अन्यथा आमचे अशिलांना संबंधितांचे विरूध्द योग्य ती कायदेशिर कारवाई करणे भाग पडेल. सदर जमिनी मधील आमचे अशिलांचा हिस्सा पृथक करून मिळणे करिता आमचे अशिल हे जुन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ अथवा वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयांत वाटपाचा दावा दाखल करीत आहेत याचीही सर्वानी नोंद घ्यावी.

सही/-
(विनय पंडित धेंडे)
ॲडव्होकेट

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आयआयटी कानपूर येथील राष्ट्रीय हॅकेथॉन स्पर्धेत पीसीसीओईआर चा प्रथम क्रमांक

पिंपरी (दैनिक संध्या) : भारतीय तंत्रज्ञान संस्था, कानपूर आणि जेएसडब्ल्यू ग्रुप ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयआयटी कानपूर येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय हॅकेथॉन स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) च्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या "टीम तटरक्षक" ने "इनोवेशन इन रेझिलियनट इन्फ्रास्ट्रक्चर" हा प्रकल्प सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. देशभरातून ३०० पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयातील संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. पीसीसीओईआरच्या विजेत्या संघात अभिषेक गिरी, वैशाख आनंद एम, माहेक फातन, सृष्टी सावळी यांचा समावेश होता. टीम तटरक्षक ने मजबूत तांत्रिक पायाभूत रचना, नाविन्यपूर्ण डिझाईन, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणीची क्षमता असलेला प्रकल्प सादर केला. 'किनारपट्टी वरील पूरपरिस्थिती आणि हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आपत्तींचा परिणाम कमी करण्यासाठी पर्यावरणीय बुद्धिमत्ता आणि संरचनात्मक अभियांत्रिकी तत्त्वांचा समन्वय साधून शाश्वत पायाभूत सुविधा विकसित करणे' हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता. प्रकल्पांचे सखोल तांत्रिक परीक्षण, दस्तऐवजीकरण पडताळणी, व्यवहार्यता विश्लेषण, नूतन उपक्रम मूल्यांकन तसेच व्यावसायिक विस्तारक्षमतेचे परीक्षण अशा कठोर निकषांवर मूल्यमापन करण्यात आले. विजेता संघाला पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सिव्हिल इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. समीर सावरकर, आरएनडी प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे यांनी मार्गदर्शन केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.



### प्रेरणा कपूर बनली सीए

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवडच्या प्रेरणा कपूर हिने चार्टर्ड अकाउंटंट (सीए ) फायनल परीक्षेत घवघवीत यश मिळवत संपूर्ण भारतातील गुणवत्ता यादीत २९वा क्रमांक पटकावला आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चॅर्टर्ड अकौंटन्ट ऑफ इंडिया ने घेतलेल्या परीक्षेचा १ मार्च २०२६ रोजी जाहीर झाला. या निकालात अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत तिचे हे यश विशेष ठरले. या यशाचे श्रेय तिने आपल्या सातत्यपूर्ण मेहनतीसोबतच आई-वडिलांचा भक्कम पाठिंबा मिळाला.आणि आर्टिकलशिपदरम्यान मिळालेल्या सीए प्राजक्ता चिंचोळकर व सीए ऋषिकेश चिंचोळकर यांचे मार्गदर्शन लाभले.




### डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठात 'सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन लॅब'चे उद्घाटन

पिंपरी (दैनिक संध्या) : भारताच्या सेमीकंडक्टर क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठात अत्याधुनिक सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग प्रयोगशाळेचे उद्घाटन इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला डीवायपीआययूचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस एस. पाटील, कुलगुरू प्रा. मनीष भल्ला तसेच वरिष्ठ प्राध्यापक, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रयोगशाळेत अत्याधुनिक क्लास 10,000 आणि क्लास 100,000 क्लीनरूम सुविधा उपलब्ध असून, जागतिक दर्जाच्या फॅब्रिकेशन पद्धतीनुसार प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि संशोधनाची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. वेफर प्रोसेसिंग, फोटोलिथोग्राफी, डिफ्युजन, थिन-फिल्म डिपॉझिशन आणि कॅरेक्टरायझेशन यांसारख्या प्रक्रियांमध्ये प्रत्यक्ष अनुभव देऊन ही प्रयोगशाळा उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणार आहे.

### प्रा. तळे यांना नेपाळमध्ये पुरस्कार प्रदान

पिंपरी (दैनिक संध्या) : नेपाळ येथे आयोजित केलेल्या ह्यमन हार्मनी आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रा. विठोबा तळे यांना ह्यूमन हार्मनी अवार्ड देवून सन्मानीत करण्यात आले. नेपाळ ची राजधानी काठमांडू थामेल येथे संपन्न झाला. यावेळी फ्रांस, जपान, यू ए ई, थायलंड चे राजदूत तथा युनेस्कोचे प्रतिनिधी एच ई मोहन श्रेष्ठ, नेपाळचे पंतप्रधान कार्यालयीन सचिव याम तिवारी, भारतातून डॉ प्रसन्न देशमुख,ह्यूमन हार्मनी संस्थेचे संचालक सुरज गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी भारतासमवेत नेपाळ मलेशिया सिंगापूर चीन बांगलादेश यामधील नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. गेली २० वर्षांपासून ताथवडे येथील शाहू इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. ते करियर मार्गदर्शक असून, पीएचडी गाईड, आंतरराष्ट्रीय शोधनिबंध सादर केलेत. तळे यांच्या ४ पेटंट नावावर आहे.असिस्टंट व्हेईकल इंस्पेक्टर परीक्षा मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या कार्यामुळे संस्थेचे अध्यक्ष तानाजी सावंत, डॉ सुधीर भिलारे,रवी सावंत,डॉ अविनाश बडधे, डॉ सुनील कांदळकर, डॉ सुभीम खान यांनी अभिनंदन केले आहे.

### महापौर रवी लांडगे यांना यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार जाहीर



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पिंपरी – चिंचवड विभागाच्या वतीने गुरुवार, दिनांक १२ मार्च २०२६ रोजी दुपारी ठीक ०४:०० वाजता यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संपन्न होणाऱ्या या सन्मान सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य आदर्शगाव संकल्प योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार भूषविणार असून ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहील. नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे सोहळ्याचे स्वागताध्यक्ष आहेत.

# शहरातील क्रीडा सुविधांचा कायापालट होणार

**सभापती कैलास कुटे यांच्याकडून पाहणी दौरा**

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध क्रीडा प्रकल्पांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि नागरिकांना अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा समिती सभापती कैलास कुटे यांनी आज सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. आज सकाळी १० वाजता मोहननगर जलतरण तलावापासून या दौऱ्याची सुरुवात झाली. यावेळी त्यांच्यासोबत क्रीडा उपायुक्त पंकज पाटील, माजी नगरसेविका मीनल यादव, कार्यकारी अभियंता (क्रीडा स्थापत्य) विजय जाधव, कनिष्ठ अभियंता संदीप ठोकळे आणि प्र. क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे उपस्थित होते. पाहणी दरम्यान सभापतींनी जलतरण तलावाच्या सुरक्षेवर विशेष भर दिला. तलावाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नेमणे, नागरिकांच्या सुविधेसाठी लॉकर बॉक्स उपलब्ध करून देणे आणि महिला प्रसाधनगृहात एक्झॉस्ट फॅन बसवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, वीज बचतीसाठी या ठिकाणी सोलर पॅनल बसवण्यात येणार असून लहान मुलांच्या बेबी टँकभोवती सुरक्षिततेसाठी रेलिंग बसवण्याचे आदेशही त्यांनी दिले.





लॉन टेनिस कोर्टच्या शेजारील मोकळ्या जागेचा वापर करून तिथे क्रिकेटसाठी टर्फ तयार करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. मैदानाभोवतीच्या वाळलेल्या झाडांच्या फांद्या कापण्यासाठी उद्यान विभागाशी त्वरित पत्रव्यवहार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रात्रीच्या वेळी खेळाडूंना सराव करता यावा यासाठी हायमास्ट दिवे बसवण्यावरही चर्चा झाली. प्रबोधनकार ठाकरे व्यायामशाळेची पाहणी करताना, ओपन जिमची आवश्यक ती दुरुस्ती करण्याच्या सूचना सभापती कैलास कुटे यांनी दिल्या. तसेच आकाश काळभोर व्यायामशाळेतील मोकळ्या जागेत नवीन बांधकाम किंवा शेड मारून जागेचा विस्तार करण्याचे नियोजन आहे. काळभोर नगर येथील शंकर शेट्टी उद्यानासह शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि शेड उभारण्याचे प्रस्तावित आहे. उद्यानात ओपन जिमच्या दुरुस्तीसाठी ठेकेदाराचा क्रमांक दर्शनी भागात लावण्याचे आदेश देण्यात आले, जेणेकरून नागरिक तक्रार करू शकतील. विशेष म्हणजे, बागेत बसवण्यात आलेल्या वाय-फाय बॉक्सची माहिती घेऊन नागरिकांना ती सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्यानांमध्ये तब्बल १००० नवीन बाके (बेंच) खरेदी करण्याबाबत उद्यान विभागाला कळविण्यात आले आहे.

> "नागरिकांना आणि खेळाडूंना उत्तम दर्जाच्या सुविधा मिळणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. या दौऱ्यात आढळलेल्या त्रुटी दूर करून तातडीने विकासकामे पूर्ण केली जातील."
> **– कैलास कुटे, सभापती, क्रीडा समिती.**

## चिंचवडमध्ये बनावट 'हार्पिक' विक्रीप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**चिंचवड (दै. संध्या) :**

■ १ लाख ३४ हजारांचा साठा जप्त

बनावट हार्पिक विक्रीप्रकरणी चिंचवड पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सुमारे १ लाख ३४ हजार ४२० रुपयांच्या बनावट मालाचा साठा जप्त करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ५ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास चिंचवड येथील कृष्णा हॉटेलजवळ, वाल्हेकरवाडी रोड परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडे Reckitt Benckiser India Private Limited कंपनीच्या हार्पिक या उत्पादनाच्या नावाने बनावट माल विक्रीसाठी साठवून ठेवलेला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करत हिराराम गिरिधरलाल चौधरी (वय ४२, रा. चिंचवडेनगर), विष्णुकुमार खंगाराम चौधरी (वय ३३, रा. स्वामी विवेकानंद सोसायटी, चिंचवड) यांच्यासह गजेंद्र शेरसिंग जव्हेरी (रा. संगमनेर, जि. अहमदनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी धरमवीर अमरनाथ धल्लोड (वय ४०, रा. शितलानगर, मामुर्डी, पुणे) यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींनी कंपनीच्या उत्पादनाची बनावट प्रत तयार करून विक्रीसाठी साठा ठेवला होता, असा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३(५) तसेच कॉपीराइट कायदा १९५७ चे कलम ५१(ब), ६३ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दुधे हे करीत आहेत.

## मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपला पाहिजे - डॉ. किर्ती धारवाडकर

**पिंपरी, पुणे (दै. संध्या) :**

■ संत साहित्यातून समाज प्रबोधन आणि अंधश्रद्धेवर प्रहार - डॉ. किर्ती धारवाडकर

■ एसबीपीआयएममध्ये मराठी भाषा गौरवदिन आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. मराठी संतांनी आपल्या भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान, कथा, नाटक, कादंबऱ्या, कवितासंग्रह तसेच इतिहास संशोधकांच्या बखर, प्रवास वर्णन, आत्मचरित्र अशा विविध साहित्यातून समाजाचे प्रबोधन करून अंधश्रद्धेवर प्रहार केले. यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. आपल्या भाषेचा हा समृद्ध वारसा आपण जपला पाहिजे असे मार्गदर्शन एसबीपीआयएम संस्थेच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी केले.

मराठी भाषा गौरवदिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एसबीपीआयएम महाविद्यालय येथील ग्रंथालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस एसबीपीआयएम संस्थेच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. योगेंद्र देवकर, युवा शाहीर शुभम भुतकर, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

युवा शाहीर शुभम भुतकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर वर पोवाडा सादर केला. प्रा. स्वाती सातपुते, विद्यार्थीनी अनघा कुलकर्णी यांनी समन्वयक म्हणून काम केले.

सूत्रसंचालन हर्षदा पाटील यांनी केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरवदिन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

# कार्ला फाटा येथे उड्डाणपूल उभारण्याचा मार्ग मोकळा

*'एमएसआरडीसी'ची मान्यता; खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश*

**मावळ (दै. संध्या) :**

पुणे-मुंबई महामार्गावर लोणावळ्याजवळील कार्ला फाटा येथील वाहतूक कोंडी सुटणार आहे. येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि सुरक्षेसाठी नवीन उड्डाणपूल उभारण्यास

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)ने मान्यता दिली आहे. ९० कोटी ३२ लाख रुपयांचा निधी उपअभियंता राहुल पवार यांनी मंजूर केला आहे. या पुलासाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. कार्ला फाटा येथे मोठी वाहतूक कोंडी होत होती. सुटीच्या दिवशी या कोंडीत भर पडते. सातत्याने छोटे-मोठे



अपघात होत होते. त्यामुळे कार्ला फाटा येथे उड्डाणपूल उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे केली होती. त्यानुसार खासदार बारणे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्याला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आई एकविरा देवीचे दर्शन घेण्यासाठी काही महिन्यांपूर्वी आलेल्या शिंदे यांनी कार्ला फाटा येथे उड्डाणपूल उभारण्याची घोषणा केली होती. या प्रकल्पासाठी सुमारे ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, राज्यभरातून देवीच्या दर्शनासाठी भाविक कार्ला येथे येत असतात. पर्यटननगरी लोणावळ्याकडे जाणाऱ्या पर्यटकांचीही मोठी गर्दी असते. येथे अनेकदा अपघात होतात. वाहनांची मोठी गर्दी होते. रविवारी प्रचंड वाहतूक कोंडी होते. त्यामुळे उड्डाणपूल उभारण्याची नागरिकांची मागणी होती. त्यानुसार पूल उभारण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आई एकविरा देवी येथील विविध विकास कामांच्या शुभारंभासाठी आल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उड्डाणपूल उभारण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार उड्डाणपूल उभारण्यास मान्यता मिळाली आहे.

या भागात होणारी वाहनांची गर्दी कमी करण्यास या पुलामुळे मदत होणार आहे. वाहतूक सुरळीत होईल. अपघातांचे प्रमाण घटेल. कार्ला लेणी, एकवीरा देवी मंदिर पर्यटकांना वाहतूक कोंडीला सामोरे लागणार नाही. या उड्डाणपूलासाठी ९० कोटी ३२ लाख रुपयांचा निधी एमएसआरडीसीने मंजूर केला आहे. आता लवकर निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात करावी, अशी सूचना खासदार बारणे यांनी एमएसआरडीसीला केली आहे.

## श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी पाठपुरावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील मूलभूत समस्यांवर चर्चा करून त्यांचे त्वरित निवारण करण्यासाठी उपाययोजना ठरवण्यात आल्या.

बैठकीत नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, बंद पथदिव्यांचे दुरुस्ती कामे, सांडपाणी वाहिन्यांचे नियमन आणि खराब रस्त्यांच्या दुरुस्तीवर सविस्तर चर्चा झाली. या सर्व बाबींसाठी नगरपालिकेच्या तांत्रिक टीमकडून सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. महेश लांडगे यांनी या मुद्द्यांवर राज्य शासनाकडे विविध मागण्यांचा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले असून, या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी नियमित बैठकांचे आयोजन करण्याचे ठरले आहे. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी माधव खांडेकर, गटनेते सचिन गिलबिले तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीत उपस्थित सर्वांनी शहराच्या विकासासाठी आळंदीकरांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवण्याचा आणि स्वच्छ, सुबक व विकसित आळंदी घडवण्याचा संकल्प व्यक्त केला. याशिवाय, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र आळंदीमध्ये ज्ञानपीठाची पायाभरणी होणार असून, आळंदीला "विकासाचे रोलमॉडेल" बनवण्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## भाजप पिंपरी-चिंचवड शहर-जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्षपदी संजय पटनी यांची नियुक्ती




**पिंपरी (दै. संध्या) :**

भारतीय जनता पार्टीच्या संघटनेत गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठेने कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांना योग्य सन्मान देण्याचे धोरण पक्षाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय पटनी यांची भाजप पिंपरी-चिंचवड शहर-जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली असून, "निष्ठावंत कार्यकर्त्याला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला" अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. पिंपरी चिंचवड भाजपच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयामध्ये शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी संजय पटनी यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी पक्षाचे संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे यांच्यासह अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. संजय पटनी यांच्यासोबतच पक्षाने इतरही महत्त्वाच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये क्रीडा प्रकोष्ट शहराध्यक्ष राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे, दिघी-गवळीनगर-गव्हाणेवस्ती मंडलाध्यक्ष प्रमोद परदेशी, चिखली-कृष्णानगर मंडलाध्यक्ष अजय साने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे शहरात भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होणार आहे.

# निगडी बसस्टॉपवरील वाहतूक कोंडी गंभीर

## बसथांबा भक्ती-शक्ती उद्यानासमोर हलविण्याची मागणी

**पिंपरी (दै. संध्या) :**

मुंबई-पुणे महामार्गावरील निगडी बसस्टॉप परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम सुरू असल्यामुळे रस्ता अरुंद झाला असून त्याचा थेट परिणाम वाहतुकीवर होत आहे. या बसथांब्यावर दररोज हजारो प्रवासी ये-जा करत असल्याने परिसरात सतत गर्दीची परिस्थिती निर्माण होत आहे.

मोठ्या ट्रक, ट्रॅव्हल्स बस तसेच इतर जड वाहनांमुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होत आहे. याशिवाय काही रिक्षाचालक बसथांब्याजवळ रस्त्यावरच गाड्या आडव्या लावून प्रवासी वाहतूक करत असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होत आहे. बसथांब्याच्या आजूबाजूला टपरीधारक आणि





हातगाडीधारकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.

वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून बसची वाट पाहावी लागत आहे. अनेकदा प्रवाशांना रस्त्यावर उभे राहून बसमध्ये चढण्यासाठी कसरत करावी लागत असून यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर पीएमपीएमएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन निगडी बसस्टॉप हा भक्ती-शक्ती उद्यानासमोर स्थलांतरित करावा, अशी मागणी भाजपाचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

तसेच बसथांब्याच्या परिसरातील अतिक्रमण तातडीने हटवून रस्ता मोकळा करावा, रिक्षाचालक आणि ट्रॅव्हल्स बस यांना बसथांब्याजवळ प्रवासी वाहतूक करण्यास मज्जाव करावा आणि मोठ्या वाहनांना या मार्गावर प्रवेशबंदी घालावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

निगडी भक्ती-शक्ती मार्गे बसथांबा स्थलांतरित केल्यास वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि प्रवाशांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा मिळेल, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अनेकांत टेक्रोकॉम्प 2026 मध्ये विद्यार्थ्यांचा तांत्रिक आविष्कार

बारामती (दैनिक संध्या) : बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातर्फे आयोजित 'अनेकांत टेक्नोकॉम्प २०२६' या आंतरमहाविद्यालयीन तांत्रिक स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात बारामती, फलटण, पुणे आदी परिसरातील विविध महाविद्यालयांतील १८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपल्या तांत्रिक कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. यू. डी. चौधरी यांनी स्वागतपर भाषणातून स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. समन्वयक प्रा. अस्मिता ए. भगत यांनी स्पर्धेच्या आराखड्याची माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सायबेज सॉफ्टवेअरचे सिस्टिम ॲनालिस्ट किशोर बागल यांनी विद्यार्थ्यांना समस्या निवारण (Problem Solving) कौशल्य विकसित करण्याबरोबरच नाविन्यपूर्ण विचार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर होते. त्यांनी आधुनिक डिजिटल युगात तांत्रिक कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. या महोत्सवात हॅकाथॉन, टेक्निकल क्विझ आणि कोडिंग चॅम्पियन अशा तीन प्रमुख स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोमल थेऊरकर व प्रा. लता जाधव यांनी केले, तर प्रा. पी. सी. स्वामी यांनी आभार मानले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांच्या नियोजनामुळे हा तांत्रिक महोत्सव यशस्वीपणे पार पडला. विजेत्यांना करंडक, पदके आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### आदिशक्ती महिला पुरस्कार सन्मान सोहळ्याचे आयोजन

नारायणगाव (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त श्री आदिशक्ती महिला प्रतिष्ठान, इनरव्हील क्लब नारायणगाव आणि श्री आदिशक्ती महिला पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील कर्तृत्ववान महिलांचा "आदिशक्ती महिला पुरस्कार सन्मान सोहळ्याचे' आयोजन सोमवार, दि. १० मार्च २०२५ रोजी सायं. ४ ते ८ वाजेपर्यंत श्री मुक्ताबाई मंगल कार्यालय, नारायणगाव येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार असून महिलांसाठी विशेष ग्रुप डान्स, लकी ड्रॉ, डिनर सेट, रेजगाडी सेट यांसारखी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.कार्यक्रमात निवेदक दत्ता जाधव यांच्या सादरीकरणातून सुमधुर गीतांची मैफल रंगणार आहे. तसेच महिलांसाठी साडी, ड्रेस, पर्स, ज्वेलरी आदी वस्तूंची खरेदी करण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे. डान्समध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला विशेष गिफ्ट देण्यात येणार असून त्यासाठी नावनोंदणी आवश्यक आहे. नावनोंदणीसाठी अंजली खैरे (मो. ९६८०३६०३४४), रोहिणी जगदाळे (मो. ९८८७९९९४३६) आणि समृद्धी वाजगे (मो. ९१६००५४५४५) यांच्याशी संपर्क साधावा तसेच कार्यक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

### बदलत्या वातावरणामुळे रोगराईच्या प्रमाणात वाढ

नारायणगाव (दैनिक संध्या) : दिवसभर कडक ऊन व रात्रीच्या वेळी बोचरी थंडी अशा बदलत्या वातावरणामुळे थंडी,ताप, सर्दी,मलेरिया यासारख्या आजारामुळे मुले, जेष्ठ नागरिक व महिला वर्ग आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यंदा फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता जाणवू लागली होती. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच दिवसा प्रचंड उन्हाचे चटके जाणवत होते. व रात्री 11 नंतर गार हवा सुटून सकाळपर्यंत हवेत गारवा राहिल्यामुळे काही सकाळी फिरायला जाणारे लोक थंडीचा आनंद घेत होते. परंतु वयोवृद्ध लोक थंडीने कुडकुडत होते. दिवसा ऊन व रात्री थंडी यामुळे लहान मुले, महिला वर्ग, व वयोवृद्ध थंडी,ताप,खोकला, पडसे यामुळे आजारी पडत असून दवाखाने सुद्धा फुल झालेले दिसत आहेत. काही दिवसांपासून उन्हाचा पारा वाढला असून होळीनंतर आता तापमानात वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता आणखी तीव्र होऊन दिवसा उन्हाचे जास्त चटके लागत आहेत. परंतु रात्रीच्या वेळी हवेत गारवा असल्यामुळे बदलत्या वातावरणामुळे रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे डॉक्टर अनिल शेवाळे यांनी सांगितले. यावर्षी पाऊस जास्त झाल्यामुळे आता उन्हाळाही कडक पडणार आहे.मार्च महिन्याच्या अखेरीस तापमान त्रासदायक ठरण्याची शक्यता वाढली आहे. सध्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कांदा, बटाटा काढणीला वेग आला असून शेतातील मजूर व शेतकरी दिवसभर कडक उन्हातच काम करीत आहेत. त्यामुळे उन्हापासून संरक्षण मिळवण्यासाठी त्यांनी दिवसभर शेतात काम करताना डोक्यात टोपी घालावी. एकदम कडक उन्हात थंड पेय आईस्क्रीम इत्यादींचे सेवन करू नये, थंड पाणी पिऊ नये. त्याचबरोबर एखाद्याला थोडी कणकण वाटू लागल्यास दुखणे अंगावर काढू नये त्याने डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करावा, असे प्रसिद्ध व तज्ञ डॉक्टर अनिल शेवाळे यांनी सांगितले आहे.

### ग्राहकांना न सांगताच ग्रामीण भागात स्मार्ट मीटर बसवण्याचा सपाटा



नारायणगाव (दैनिक संध्या) : ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसवण्याची कोणतीही सक्ती केली जाणार नाही. असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले असले तरी,वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांना न सांगताच स्मार्ट मीटर बसवण्याचा व वीज कनेक्शन कट करण्याचा सपाटा ग्रामीण भागात सुरू झाला असल्यामुळे असंख्य गोरगरीब ग्राहकांमध्ये संताप व नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यातील खेडोपाड्यांमध्ये या मीटर बसविणाऱ्या ठेकेदारांची कर्मचारी ग्राहकांना पूर्व कल्पना न देताच पूर्वीचे मीटर काढून त्याजागी स्मार्ट मीटर बसवीत आहेत. या बऱ्याचशा कर्मचाऱ्यांकडे नागरिकांना दाखविण्यासाठी ओळखपत्रसुद्धा नसल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. ग्राहकांना न सांगताच हे मीटर बसविले जात असल्यामुळे संभ्रम निर्माण होत आहे. त्याचबरोबर ग्राहकांचे वीज कनेक्शन कोणतीही पूर्वकल्पना न देता कट केले जात असल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत वीज वितरण कंपनीचे कर्मचारी यांना विचारले असता ते म्हणाले, स्मार्ट मिटर बसविल्यामुळे एक महिन्याचे बिल थकले असले तरी आता वीज कनेक्शन आपोआप बंद होणार आहे. परंतु जुन्या मीटरच्या जागी नवीन मिटर बसविले कधी हाही प्रश्न ग्राहकांना पडला असून वीज कनेक्शन कट करण्याअगोदर ग्राहकांना बिलसंदर्भात पूर्वकल्पना द्यावी.दिवस व रात्रीच्या वेळी लाईट घालवण्याचे प्रकार व प्रमाण थांबवावे, अशी मागणी तालुक्यातील वीज ग्राहक व शेतकरी करत आहे.

# संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

जुन्नर (दै. संध्या)



शुक्रवार दि.०६ मार्च २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने पहाटे ०६.१५ वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता गोळेगाव येथील गोविंद यशवंत मेहेर, सदाशिव शंकर ताम्हाणे, जयवंत ज्ञानेश्वर डोके व रत्नाकर तुकाराम डोके यांनी प्रत्येकी १ कॅरेट द्राक्षे प्रसाद दिला.

मंदिरात सकाळी ६ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. दिवसभर भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त प्रभाकर जाधव, मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर गोळेगाव येथील जय महाराष्ट्र ग्रुप यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक व जुन्नर परिसरातुन मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

# स्वामी गोविंददेव गिरी यांच्या वक्तव्याचा आळंदी देवस्थानकडून निषेध

आळंदी (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या "ज्ञानोबा ते तुकोबा" या राष्ट्रीय परिषदेतील बीजभाषणात स्वामी गोविंददेव गिरी यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या वाङ्मयाबाबत केलेल्या विधानाचा श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची यांनी जाहीर निषेध नोंदविला आहे. संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ रामचंद्र देखणे यांच्या नेतृत्वाखालील विश्वस्त मंडळाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित "ज्ञानोबा ते तुकोबा" राष्ट्रीय परिषदेत स्वामी गोविंददेव गिरी यांनी संतांच्या वाङ्मयाबाबत तौलनिक उद्गार काढताना हे वाङ्मय ग्रंथ नसून भाष्य व संकलन असल्याचा निष्कर्ष मांडला. या विधानाशी ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी पूर्णपणे असहमत असून ते संतपरंपरेच्या विचारांशी विसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, संत ज्ञानेश्वर महाराजांनी सहज, सुंदर, रसाळ आणि अलंकारिक मराठी भाषेत तत्वज्ञानाचे अप्रतिम विवेचन करणारा ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी हा अलौकिक ग्रंथ निर्माण केला असून तो मराठी वाङ्मयाचा अमूल्य ठेवा आहे. स्वतः संत ज्ञानदेवांनीच ग्रंथाच्या उपसंहारात "मग आर्ताचेनि वोरसे। गीतार्थग्रंथन मिसे। वर्षला शांतरसे। तो हा ग्रंथुः।।" असे म्हणत ज्ञानेश्वरीचा उद्देश स्पष्ट केला आहे. तसेच संत नामदेव महाराजांनीही "नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एकतरी ओवी अनुभवावी।।" असे म्हणत ज्ञानेश्वरीचा ग्रंथ म्हणून गौरव केला आहे. संत ज्ञानदेवांनी "अमृतानुभव" हा तत्वचिंतनात्मक ग्रंथ निर्माण करून वैष्णव भक्तीपरंपरेला नवी दिशा दिली. पुढे संत नामदेवांच्या अभंगरचना, संत एकनाथांनी निर्माण केलेला भागवत ग्रंथ आणि संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा हे सर्व संतवाङ्मय केवळ साहित्य नसून जगाच्या कल्याणाचा अमृतस्रोत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वामी गोविंददेव गिरी यांनी केलेल्या विधानामुळे संतपरंपरेच्या भावनांना ठेस पोहोचल्याची भावना व्यक्त करत संस्थान कमिटीने या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदविला आहे. तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांनी स्वामी गोविंददेव गिरी यांना सुबुद्धी द्यावी आणि त्यांनी सकल संतांची क्षमा मागावी, अशी अपेक्षाही संस्थान कमिटीने व्यक्त केली आहे.

## रोहित्र चोरणाराची माहिती देणाऱ्यास बक्षीस देणार

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यात शेतातील रोहित्र चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता व्यक्त होत आहे. पाच ते दहा लाख रुपये किंमतीच्या रोहित्रांमधून चोरटे केवळ २५ ते ३० हजार रुपयांच्या कॉपर वायरच्या लालसेपोटी संपूर्ण यंत्रणा उध्वस्त करत असल्याचे प्रकार समोर येऊ लागल्याने रोहित्र चोरणारांची माहिती देणारास बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. रोहित्र चोरीला आळा घालण्यासाठी खेड बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषदेचे सदस्य विजय शिंदे व समर्थ फाउंडेशन यांच्या वतीने विशेष पुढाकार घेण्यात आला आहे. चोरी करणाऱ्या टोळीबाबत ठोस माहिती देणाऱ्या किंवा त्यांना पकडण्यास मदत करणाऱ्या व्यक्तीस २१ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. समर्थ फाउंडेशनच्या वतीने माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी न घाबरता पुढे येऊन माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच परिसरात कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद हालचाली आढळल्यास किंवा कोणी डीपीची छेडछाड करताना दिसल्यास तात्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील रोहित्रांवर लक्ष ठेवून सतर्क राहावे व संशयास्पद हालचाली दिसल्यास लगेच माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## डोर्लेवाडीत संत तुकाराम बीज सोहळा उत्साहात साजरा

डोर्लेवाडी (दै. संध्या)



डोर्लेवाडीत संत तुकाराम महाराज बीज उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पुणे,सोलापूर, सातारा जिल्ह्यातून ५०हजारहून अधिक भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.स्व.अजित पवार यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.देवस्थान समिती व सांप्रदायिक भजनी मंडळाच्या वतीने बीज उत्सव सोहळ्यानिमित्त ६७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.शैला महाराज यादव व बाळासाहेब नाळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली टाळ मृदंगाच्या गजरात भव्य गाथा पारायण झाले.सप्ताहात भागवत शिंदे,शांताबाई बोराटे, माऊली नवले,राजेंद्र कंडरे, दत्तात्रय घुले,विजय शेंडे, शैला यादव यांची प्रवचने झाली.तसेच कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत असे शरद महाराज काळे,रोहिदास महाराज शास्त्री,सुनील महाराज निवंगुणे,समाधान महाराज पगार,एकनाथ महाराज गोळेसर,जयंत महाराज गोसावी यांची कीर्तने झाली.आज पहाटेच मंदीरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळी महाभिषेक झाल्यानंतर बाळासाहेब महाराज नाळे यांचे प्रवचन झाले. त्यानंतर लक्ष्मण महाराज कोकाटे यांचे बीजे निमित्त फुलाचे कीर्तन झाले.कीर्तनात त्यांनी संत तुकाराम महाराज वैकुंठगमनाचे वर्णन केले तसेच स्व.अजित पवार यांना लक्ष्मण महाराज कोकाटे व सोमनाथ भिले यांनी श्रद्धांजली अर्पण केली.त्यानंतर दुपारी १२ वाजता अखंड हरिनामाचा गजर झाला.त्याच बरोबर अत्यंत जड अंतकरणाने भाविकांनी गुलाल पुष्प वर्षाव करून बीजेचा सोहळा साजरा केला. दुपारी परिसरातील नामवंत भजन गायकांचा भजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर टाळ मृदंगाच्या गजरात दिंडी मिरवणूक काढण्यात आली. ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील स्वच्छता,रस्ते दुरुस्ती,तसेच शुद्ध पाण्याची सोय करण्यात आली होती.बारामती शहर पोलीस स्टेशनच्या वतीने मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.वीज मंडळाच्या वतीने अखंड वीज पुरवठा करणेत आला.प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने भाविकांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आला.

## बारामती शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसची कार्यकारणी जाहीर

बारामती (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बारामती शहर युवक कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बारामती शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, युवक शहराध्यक्ष अभिजीत घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली शहर पक्ष कार्यालयात झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून व पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी युवक काँग्रेस बारामती शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आल्याची माहिती युवक शहराध्यक्ष अभिजीत घाडगे यांनी दिली. या प्रसंगी बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अँड किरण इंगळे, माजी नगराध्यक्ष इम्तियाजभाई शिकलकर, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ) सुरज देवकाते, विद्यार्थी सेल अध्यक्ष मेघराज माने तसेच कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते होते.

**अशी आहे युवक कार्यकारणी**

शहर युवक उपाध्यक्ष - संदीप अडागळे, गौरव जाधव, रोहित तपकिरे, सचिन नगरे, श्रीकांत सोनवणे, ओंकार महाडिक, कुणाल झगडे, किशोर पाचंगे, युवक कार्याध्यक्ष - गौतम शिंदे, अभिजीत ढवाण, मयूर दराडे, युवक सरचिटणीस - शुभम गालींदे, स्वप्नील काकडे ,प्रसाद लोळगे, ओंकार शिंदे, सुरज खामगळ, योगेश पवार ,साबीर पठाण, राहुल बनकर, युवक संघटक - रोहित चौधर, धनंजय ढवाण, आयुष गुप्ता, स्वप्निल हेंद्रे, प्रियांशु भोसले, प्रतीक जोजारे , प्रसाद गाडे, गणेश काजळे, ओंकार जाधव, प्रणव जमदाडे युवक सोशल मीडिया प्रमुख - तुषार सावंत

## अश्विनी भोसले यांची पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी


चाकण (दै. संध्या)



चाकण लगतच्या खराबवाडी येथील अश्विनी विनायक भोसले यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल परिसरातून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर अश्विनी भोसले यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे अनेक तरुणांना स्पर्धा परीक्षांकडे वळण्याची प्रेरणा मिळणार आहे. कुटुंबीयांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची अथक मेहनत यांच्या बळावर त्यांनी ही हे यश मिळवले. त्यांच्या निवडीमुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी करत समाजसेवेत मोलाचे योगदान देणार असल्याचे अश्विनी भोसले यांनी सांगितले.

# हमीभावाने हरभरा खरेदीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुरू

बारामती (दै. संध्या)



शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि बाजारभावातील चढउतारांपासुन संरक्षण मिळावे यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभुत किंमत योजने अंतर्गत हरभरा हमीभाव खरेदी केंद्र सुरू करणेत आले असुन ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया दि. १ मार्च २०२६ पासुन सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना हमीभावाने शेतमाल विक्रीची संधी उपलब्ध करून देणे,हा किमान आधारभुत किंमत योजनेचा मुख्य उद्देश आहे. बारामती बाजार आवारात लिलावात सर्वसाधण दर्जा असलेल्या हरभऱ्याचे दर हमीभावा पेक्षा कमी निघत असल्याने शासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार हरभरा (चना) खरेदी केंद्र मंजुर झाल्याचे मार्केटींग फेडरेशन,पुणे यांनी कळविलेल्या नुसार ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया दि ३१ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे हरभरा ऑनलाईन नोंदणी निरा कॅनॉल संघ, बारामती येथे मुदतीत करून खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे सभापती विनायक गावडे व उपसभापती अरूण सकट यांनी केले आहे. बारामती तालुक्यातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम २०२६ मधील हमीभावाने हरभरा खरेदीची ऑनलाईन नोंदणी १ मार्च २०२६ पासुन सुरू झाली असल्याची माहिती बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघाचे चेअरमन सतिश काकडे यांनी सांगितले. सध्या बाजार आवारात हरभऱ्याचे दर प्रति क्विंटल सरासरी रू. ४९००/- तर कमाल रू. ५१००/- असे निघत आहेत. केंद्र शासनाने हरभऱ्याचा हमीदर रू.५८७५/- असा निश्चित केला असल्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन झालेल्या शेतकऱ्यांचा हरभरा खरेदी करणेत येणार आहे. शासनाचे निकषा नुसार वाळलेला व स्वच्छ असलेला हरभरा प्रति एकर २.५० क्विंटल प्रमाणे FAQ दर्जाचा खरेदी करणेत येणार आहे. त्यासाठी ७/१२ उतारा,सन २०२५-२६ चा पिकपेरा हरभरा नोंद,आधारकार्ड आणि IFSC कोड सह बँकेचे पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर इत्यादी संपुर्ण कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसएसएम द्वारे मेसेस आलेवर बारामती मुख्य यार्ड वरील यांत्रिक चाळणी खरेदी केंद्रावर हरभरा विक्रीस आणावा अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.




# मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी

कर्नाटकात मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्यात आलीय. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधानसभेत सोशल मीडियावर बंदी घालण्याची घोषणा केलीय. 16 वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली असून, मुलांवर मोबाईल फोन वापराच्या नकारात्मक परिणामामुळे ही बंदी घालण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलंय.

मुख्यमंत्र्यांनी ऑस्ट्रेलियाचे उदाहरण देत सोशल मीडियावर घातली बंदी- मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे. गोवा, महाराष्ट्र आणि बिहारमध्ये सोशल मीडिया निर्बंधांवरही जनतेकडून अभिप्राय मागवला जात आहे. गेल्या महिन्यात राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या कुलगुरूंशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ऑस्ट्रेलियाचे उदाहरण देत सोशल मीडिया वापरावरील वय-आधारित निर्बंधांवर चर्चा केली. या काळात सरकारने सोशल मीडिया बंदीसाठी आंतरराष्ट्रीय मॉडेल्सचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला.

रोबोटिक्स आणि एआय कॅम्पस स्थापन केले जाणार - त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, इस्रो आणि केओनिक्सच्या सहकार्याने आयआयएससी अंतर्गत बंगळुरू रोबोटिक्स आणि एआय इनोव्हेशन झोन नावाचे रोबोटिक्स आणि एआय कॅम्पस स्थापन केले जाणार आहे. सोशल मीडियाच्या नकारात्मक परिणामांमुळे आणि 16 वर्षांखालील मुलांवर मोबाईल फोनचा वाढता वापर यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितलंय.

सरकारकडून उपाययोजनांचाचा गांभीर्याने विचार : कर्नाटकचे माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान (आयटी अँड बीटी) मंत्री प्रियांक खरगे यांनी 30 जानेवारीला कर्नाटक विधानसभेत सांगितले होते की, सोशल मीडियावर तरुणांचा वाढता प्रभाव पाहता, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि सोशल मीडियाचा जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार काही उपाययोजना करण्याचा गांभीर्याने विचार करीत आहे. "ही एक गंभीर समस्या आहे. फिनलंडनेसुद्धा कारवाई केलीय. युनायटेड किंग्डमदेखील अशाच प्रकारची कारवाई करण्याचा विचार करीत आहे. ऑस्ट्रेलियाने आधीच विशिष्ट वयोगटातील मुलांसाठी सोशल मीडियाच्या वापरावर बंदी घातली आहे. सोशल मीडियाचा अतिरेकी वापर टाळण्यासाठी काय करता येईल हे पाहण्यासाठी आम्ही संबंधितांशी सल्लामसलत सुरू केली आहे," असे काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र खरगे यांनी सांगितले होते.

16 वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाचा धोका : भाजपा आमदार आणि माजी मंत्री सुरेश कुमार यांनी सोशल मीडियाचा गैरवापर आणि अतिरेकी वापराच्या समस्येवर लक्ष ठेवण्यासाठी एक कार्यक्रम सुरू करण्याचा गंभीरपणे विचार करण्याचे आवाहन सरकारला केले होते. "सोशल मीडिया हा एक धोका बनला आहे. 16 वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाचा धोका टाळण्यासाठी ऑस्ट्रेलियाने एक अतिशय गंभीर निर्णय घेतला आहे. खरं तर, लोकसभेत सादर केलेल्या एका अहवालात सोशल मीडियाच्या अकाली संपर्काबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

अकाली संपर्कामुळे मुलांना पॉर्नची ओळख होत आहे. ही एक अतिशय गंभीर बाब आहे. त्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. परंतु सरकारने विशिष्ट वयाखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यापासून रोखण्यासाठी काही उपाययोजना केल्या पाहिजेत. अन्यथा आपल्या शिक्षण आणि कुटुंब व्यवस्थेवर खूप वाईट परिणाम होईल," असे सुरेश कुमार म्हणाले होते.



# दररोज मधामध्ये हे दोन घटक मिसळून प्या; होतील आश्चर्यकारक फायदे

आपल्या स्वयंपाकघरात असे अनेक औषधी मसाले असतात. जे योग्य वेळी सेवन केल्यास आपल्या शरीरातील अर्ध्यापेक्षा जास्त आजार बरे होऊ शकतात. जसे की हळद, दालचिनी, मेथीचे दाणे, मध, लवंग आणि बरेच काही. आज आम्ही तुमच्याकरिता लवंग, मध आणि दालचिनीच्या मिश्रणाबद्दल माहिती घेऊन आलोय. हे तीन घटक तुमच्या हृदयापासून ते एकूण आरोग्यापर्यंत सर्वकाही कसे सुधारू शकतात याबद्दल जाणून घेऊ.

प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. गायत्री देवी म्हणतात की, दालचिनी, लवंग आणि मध हे आयुर्वेदात जादुई औषधे मानले जातात. कारण प्रत्येकाचे स्वतःचे फायदे आहेत. मात्र, त्यांचे एकत्र सेवन केल्याने त्यांचे गुणधर्म आणि फायदे दुप्पट होतात. दालचिनी, लवंग आणि मध हे आयुर्वेदात शक्तिशाली औषधे मानले जातात. योग्यरित्या घेतल्यास ते शरीराला आतून मजबूती प्रदान करतात. परंतु चुकीच्या डोसमध्ये किंवा जास्त प्रमाणात घेतल्यास ते हानिकारक देखील ठरू शकतात. तर या तीन घटकांचे सेवन करण्याचे फायदे आणि खबरदारी याबद्दल डॉ. गायत्री देवींकडून सविस्तरपणे जाणून घेऊया...

**दालचिनी, लवंग आणि मध खाण्याचे फायदे**

- दालचिनीमध्ये पॉलिफेनॉल भरपूर प्रमाणात आढळते. हे शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्स शरीराला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून वाचवण्यास मदत करतात.
- लवंगामध्ये युजेनॉल असते, जे त्याच्या दाहक-विरोधी आणि जीवाणूरोधी गुणधर्मांसाठी ओळखले जाते.
- मधामध्ये नैसर्गिक अँटीमायक्रोबियल संयुगे असतात आणि ते जखमेच्या उपचारांना प्रोत्साहन देऊ शकतात. एकत्रितपणे, ही संयुगे सौम्य जळजळ कमी करण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.
- मध, दालचिनी आणि लवंग एकत्र खाण्याचे अनेक फायदे आहेत. तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, दालचिनी, मध आणि लवंग खाणे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ते उच्च कोलेस्ट्रॉल कमी करतात आणि रक्तवाहिन्यांवरील दाब कमी करतात. ज्यामुळे रक्त हृदयात अधिक सहजपणे वाहू शकते.
- दालचिनी ट्रायग्लिसराइड्स आणि एलडीएल (वाईट कोलेस्ट्रॉल) कमी करू शकते तर एचडीएल (चांगले कोलेस्ट्रॉल) वाढवू शकते. लवंग रक्ताभिसरण सुधारू शकते आणि रक्तवाहिन्यांची जळजळ कमी करू शकते.
- दालचिनी, मध आणि लवंग खाणे वजन कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. सकाळी रिकाम्या पोटी ते खाल्ल्याने संपूर्ण शरीराला फायदा होतो. ते अतिरिक्त चरबी जमा होण्यास प्रतिबंध करतात आणि चयापचय गतिमान करतात, ज्यामुळे चरबी जाळण्यास मदत होते.
- हिवाळ्यात सर्दी आणि खोकला होणे सामान्य आहे. मुले आणि वृद्धांना सर्दी आणि खोकल्याचा धोका जास्त असतो. दालचिनी, मध आणि लवंग एकत्र खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. त्यांचे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या संसर्गांशी लढण्यास मदत करतात.
- दालचिनी, मध आणि लवंग खाल्ल्याने पचन सुधारते. जर तुम्हाला गॅस, बद्धकोष्ठता किंवा पोटफुगीचा त्रास होत असेल तर दालचिनी आणि मध खाणे खूप फायदेशीर आहे. याव्यतिरिक्त, दालचिनी आणि मध थकवा कमी करण्यास आणि शरीराला नैसर्गिक ऊर्जा प्रदान करण्यास मदत करतात.
- दालचिनी, मध आणि लवंग खाणे फायदेशीर आहे, परंतु ते कमी प्रमाणात खाणे चांगले. जास्त प्रमाणात सेवन करणे हानिकारक असू शकते. जर तुम्हाला मधुमेह किंवा यकृताचा त्रास असेल तर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. गरोदर महिलांनी देखील ते खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### आवश्यक खबरदारी

- कॅसिया दालचिनी (सामान्य प्रकार) मध्ये कौमरिनचे प्रमाण जास्त असते. जे जास्त प्रमाणात सेवन केल्यास यकृतावर परिणाम करू शकते.
- एकाग्र लवंग तेल किंवा लवंगाचे जास्त डोस यकृताला नुकसान पोहोचवू शकतात आणि रक्त गोठण्यास अडथळा आणू शकतात.
- डॉक्टरांनी दिलेल्या औषधाऐवजी या मिश्रणावर अवलंबून राहू नका.
- जर तुम्ही औषधे घेत असाल, विशेषतः मधुमेह, संधिवात किंवा रक्त पातळ होण्याकरिता, तर नियमितपणे वापरण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**ते कसं वापरावं**

- कोमट पाण्यात 1 चमचा मध, अर्धा चमचा दालचिनी पावडर (किंवा एक छोटी काठी) आणि काही कुस्करलेल्या लवंगा मिसळा.
- जेवणापूर्वी किंवा नंतर ते प्या, किंवा चांगले पचन होण्यासाठी हर्बल चहामध्ये घाला.
- जर तुम्हाला यकृताची समस्या असेल किंवा अँटीकोआगुलंट्स किंवा रक्तातील साखर कमी करणारी औषधे घेत असाल तर ते वापरू नका.

# झोपेत असताना हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी पाळा ‘हा’ १९ सेकंदांचा नियम

हृदयविकाराचा झटका कधी येईल हे कोणालाही माहिती नसते. परंतु तो रोखण्याचे अनेक मार्ग आहेत. तज्ज्ञ म्हणतात की, झोपेत असतानाही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक टाळण्यासाठी नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तर, या लेखात, झोपेत हृदयविकाराचा झटका कसा टाळता येईल याबद्दल जाणून घेऊया...



झोपेच्या वेळी शरीर विश्रांती घेत असतानाही हृदय काम करत राहते. तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, झोपेच्या वेळी रक्तदाब आणि हृदयाचे ठोके सामान्यतः मंदावतात. परंतु, कधीकधी धमन्यांमध्ये अडथळा, उच्च रक्तदाब किंवा अनियमित हृदयाचे ठोके यासारख्या समस्या झोपेच्या वेळी हृदयविकाराचा धोका वाढवू शकतात. शिवाय, असं म्हटलं जातं की, स्लीप एपनियासारख्या झोपेच्या विकारांनी त्रस्त असलेल्या लोकांना झोपेच्या वेळी श्वास घेण्यास अडथळा आल्यामुळे हृदयावर दाब जाणवू शकतो. ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

**या पद्धती वापरून हृदयविकार टाळता येतो**

श्वास घ्या: तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, झोपण्यापूर्वी हळू आणि खोल श्वास घेतल्याने मन आणि शरीर शांत होते. ताण कमी होतो आणि हृदयाचे ठोके कमी होतात. यामुळे रक्तदाब कमी होतो. हृदयात ऑक्सिजनचा प्रवाह सुधारतो आणि झोप वाढते. नियमित लांब आणि खोलवर श्वास घेतल्याने अनियमित हृदयाचे ठोके होण्याचा धोका देखील कमी होऊ शकतो.

सराव कसा करावा: तज्ज्ञ झोपण्यापूर्वी दीर्घ श्वास घेण्याचे व्यायाम करण्याची शिफारस करतात. जसे की डायफ्रामॅटिक श्वासोच्छ्वास किंवा 4-7-८ नियम. याचा अर्थ 4 सेकंद श्वास घेणे, 7 सेकंद धरून ठेवणे आणि 8 सेकंद श्वास सोडणे. क्लीव्हलँड क्लिनिकच्या एका अभ्यासात असं आढळून आलं आहे की, या नियमाचे नियमितपणे पालन केल्याने हृदय गती आणि रक्तदाब कमी होऊ शकतो. झोपताना हृदयविकाराचा झटका रोखण्याचे हा एक चांगला मार्ग आहे. तज्ज्ञ म्हणतात की, यामध्ये सहसा जीवनशैलीतील बदल आणि आहारबद्दल खबरदारी घेणे समाविष्ट असते. ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो.

संतुलित आहार: तज्ज्ञ फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, अंडी, मांस आणि कमी चरबीयुक्त दुग्धजन्य पदार्थ खाण्याची शिफारस करतात. ते मीठ, संतृप्त चरबी, ट्रान्स फॅट आणि साखर कमी करण्याची देखील शिफारस करतात.

नियमित व्यायाम: तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, नियमित व्यायामामुळे वजन नियंत्रित होण्यास, रक्तदाब कमी होण्यास, कोलेस्टेरॉल कमी होण्यास आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते. दररोज किमान 30 मिनिटे मध्यम व्यायाम करण्याची शिफारस तज्ज्ञ करतात, जसे की चालणे, सायकलिंग किंवा पोहणे.


ताण कमी करा: तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, योगा, ध्यान आणि श्वासोच्छवासाचे व्यायाम केल्याने ताण व्यवस्थापित करण्यास मदत होऊ शकते. कारण दीर्घकालीन ताण हृदयाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकतो.

पुरेशी झोप घ्या: झोपेचा अभाव किंवा स्लीप एपनिया सारख्या झोपेच्या विकारांमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. तज्ज्ञ दररोज रात्री 7 ते 8 तासांची शांत झोप घेण्याची शिफारस करतात. दररोज त्याच वेळी झोपायला जाण्याचा आणि उठण्याचा प्रयत्न करण्याचा सल्ला देखील तज्ज्ञ देतात. स्लीप फाउंडेशनच्या एका अभ्यासात असं आढळून आलं आहे की, जे लोक रात्री सात तासांपेक्षा कमी झोपतात त्यांना हृदयविकाराचा धोका जास्त असतो.

धूम्रपान आणि मद्यपान टाळा: तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, धूम्रपान हे हृदयविकाराच्या मुख्य कारणांपैकी एक आहे. धूम्रपान सोडल्याने हृदयरोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. MayoClinic.com ने म्हटले आहे की, तंबाखूमधील रसायने हृदय आणि रक्तवाहिन्यांना नुकसान करतात आणि सिगारेटच्या धुरामुळे रक्तातील ऑक्सिजनची पातळी कमी होते. ज्यामुळे रक्तदाब आणि हृदय गती वाढते. तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने रक्तदाब वाढतो. ज्यामुळे हृदयाचे नुकसान होऊ शकते.

# कोणत्या वयानंतर गर्भधारणा होणे कठीण?

महिलांचे वय वाढत असताना, त्यांची प्रजनन क्षमता हळूहळू कमी होते. ज्यामुळे गर्भधारणा कठीण होते. जास्त वयात आई आणि गर्भधारणेशी संबंधित धोक्यांमध्ये गुंतागुंत निर्माण होऊ शकते. एका लोकप्रिय पॉडकास्टच्या अलीकडील भागात, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नंदिता पालशेतकर यांनी गर्भधारणा आणि संबंधित समस्यांबद्दल तसंच आई होण्याच्या सामाजिक दबावांबद्दल त्यांचे विचार मांडले. या लेखात, तिने गर्भधारणेसाठी योग्य वयावर देखील चर्चा केली.



स्त्रीरोगतज्ज्ञांच्या मते, महिलांसाठी गरोदर होण्यासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे सुमारे २८ वर्षे वय, परंतु आजकाल, 30 ते 35 वर्षे वय देखील व्यावहारिक मानले जाते. डॉ. नंदिता म्हणतात की, महिलांसाठी वय खूप महत्वाचे आहे. २८ वर्षांच्या आसपास, अंड्यांची संख्या कमी होऊ लागते आणि अनेक अभ्यासात हे सिद्ध देखील झालं आहे. परंतु, 35 वर्षांच्या वयानंतरही गरोदर होणे शक्य आहे. मात्र, ही प्रक्रिया अधिक कठीण असू शकते.

**गर्भधारणेसाठी योग्य वय कोणते आहे?**

असंख्य वैज्ञानिक अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, गरोदर होण्यासाठी स्त्रीसाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे ती शारीरिक, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या आई होण्यासाठी तयार असली पाहिजे. गर्भधारणेसाठी सर्वोत्तम वय 25 ते 35 वर्षे असते. या वयात महिलांची प्रजनन क्षमता सर्वोत्तम असते. 35 वर्षांनंतर, गरोदर होणे कठीण होऊ शकते.

संशोधन काय म्हणते? 2002 च्या एका अभ्यासानुसार, पहिले मूल होण्यासाठी आदर्श वय 30.5 वर्षे होते. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शननुसार, पहिले मूल होण्यासाठी आदर्श वय सुमारे 27 वर्षे आहे. दरम्यान, 2016 च्या एका अभ्यासात असं आढळून आलं की, 30 च्या दशकातील महिलांमध्ये प्रजनन क्षमता सर्वोत्तम असते, तर 20 च्या दशकातील महिलांमध्ये प्रजनन क्षमता कमी असते.

वैज्ञानिक संशोधनातून असं दिसून आलं आहे की 20 च्या उत्तरार्धात आणि 30 च्या सुरुवातीच्या काळात गरोदर राहणे शारीरिकदृष्ट्या अधिक फायदेशीर ठरू शकते. अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिशियन्स अँड गायनॅकॉलॉजिस्टच्या 2008 च्या अभ्यासानुसार, या वयात गरोदर राहिल्याने गर्भधारणेच्या गुंतागुंतीचा धोका कमी होतो. डॉ. नंदिता पोलशेतकर म्हणतात की, आजकाल महिला 30 वर्षांच्या आधी लग्न करत नाहीत, म्हणून 30 ते 35 वर्षांच्या दरम्यान पहिले मूल होणे हा एक चांगला आणि व्यावहारिक कालावधी असू शकतो.

40 किंवा त्याहून अधिक वयाच्या मुलांना जन्म देण्याची शक्यता: काही अभ्यासातून असंही दिसून आलं आहे की, काही प्रकरणांमध्ये मातृत्वाला उशीर करणे फायदेशीर ठरू शकते. २०१२ च्या एका अभ्यासातंअसे आढळून आलं आहे की, ज्या महिलांनी 40 किंवा त्याहून अधिक वयाच्या शेवटी मुलाला जन्म दिला त्यांना गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याचा धोका कमी होता. वयाव्यतिरिक्त, आई होण्यासाठी इतर अनेक



घटक महत्त्वाचे आहेत, जसे की मुलासाठी मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या तयार असणे. प्रत्येक महिलेसाठी ही वेळ वेगळी असते.

वयाचा परिणाम प्रजनन क्षमतेवर होतो: एक स्त्री तिच्या आयुष्यात अंदाजे 20 लाख अंडी तयार करते आणि वयानुसार ही संख्या कमी होते. 37 वर्षांच्या वयापर्यंत फक्त 25,000 अंडी उरतात आणि 51 वर्षांच्या वयापर्यंत 1,000 उरतात. कालांतराने या अंड्यांची गुणवत्ता देखील खराब होते.

## अक्कलदाढ काढल्याने खरोखर दृष्टी कमी होते का?

साधारणपणे, एखाद्या व्यक्तीला 32 दात असतात. मात्र, प्रौढ होईपर्यंत फक्त 28 दात राहतात. तसंच 20 वर्ष वयानंतर, वरच्या आणि खालच्या जबड्यात दोन नवीन दात येतात. त्यांना अक्कलदाढ म्हणतात. जेव्हा अक्कलदाढ येते, तेव्हा अत्यंत वेदना होतात. यामुळे, काही लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने ते काढून टाकतात. मात्र, अक्कलदाढ काढल्यानंतर डोळ्यांचे नुकसान होऊ शकते अशी अनेकांच्या मनात भिती असते. अक्कलदाढ काढून टाकल्याने खरोखर दृष्टीवर परिणाम होतो काय? यावर तज्ज्ञ काय म्हणतात ते जाणून घेऊया.

बऱ्याच लोक असा विश्वास करतात की, दात काढल्याने डोळ्यांचे नुकसान आणि दृष्टी कमी होते. याव्यतिरिक्त, अनेकांना असं वाटते की, यामुळे नसा आणि मेंदूला नुकसान होते. परंतु, तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, हे खरे नाही. अक्कलदाढ तोंडाच्या मागील बाजूस वाढते. ते जबड्याच्या हाडात किंवा हिरड्यांमध्ये अडकलेले असतात. तसंच सहसा 17ते 25 वयानंतर अक्कलदाढ येते. शास्त्रज्ञ आणि डॉक्टर त्यांना अनावश्यक अवयव मानतात. हिरवी पाने, काजू, बीन्स आणि मांस चावण्यासाठी आपले पूर्वज अक्कलदाढेचा उपयोग करायचे. परंतु, आता आपण जास्त शिजवलेले अन्न खातो. तसंच आपण फळे आणि भाज्या लहान तुकडे करतो. यामुळे तज्ज्ञांच्या मते, आपल्याला अक्कलदाढेची आवश्यकता नाही.

दंत शल्यचिकित्सक डॉ. विकास गौर म्हणतात की, दात काढल्याने दृष्टी कमी होते हा एक सामान्य गैरसमज आहे, कारण दात, डोळे आणि चेहऱ्याच्या नसा एकमेकांच्या खूप जवळ असतात. खरं तर, दृष्टी नियंत्रित करणाऱ्या ऑप्टिक नसा दात आणि जबड्यांपासून खूप दूर असतात. या नसा एकमेकांशी संवाद साधत नाहीत. दात काढल्यानेही त्यांच्यावर परिणाम होणार नाही. अक्कलदाढ काढणे पूर्णपणे सुरक्षित आहे: जेव्हा अक्कलदाढ हिरड्यांमधून बाहेर पडतात, तेव्हा तीव्र वेदना आणि खाण्यास त्रास होतो. काही लोकांच्या अक्कलदाढेमध्ये थोडासा क्षय होऊ शकतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कांडगे यांनी केली स्वखर्चातून बैठक व्यवस्था

चाकण (दैनिक संध्या) : भाविक व नागरिकांची बसण्याची गैरसोय लक्षात घेऊन येथील खंडोबा माळावरील चैतन्य कानिफनाथ मंदिर मूर्ती प्रतिष्ठापना दिनाच्या तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून चाकण नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रूपाली कांडगे यांनी जनसेवा हीच ईश्वर सेवा या भावनेतून मंदिर परिसरात बसण्यासाठी स्वखर्चातून बैठक व्यवस्था उपलब्ध करून दिली. नगरसेविका रुपाली कांडगे व माजी नगरसेवक राहुल कांडगे यांच्या हस्ते या बैठक व्यवस्थेचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक मंगेश कांडगे, चाकण पतसंस्थेचे माजी चेअरमन भगवान  कांडगे, उद्योजक विलास कांडगे, उत्तम धाडगे, चंद्रकांत गोरे व अशोक बिरदवडे आदी उपस्थित होते.



### तुकाराम बीज सोहळा उत्साहात साजरा

वाल्हे (दैनिक संध्या) : महर्षी वाल्मीकी ऋषींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुरंदर तालुक्यातील वाल्हे नगरीत जगतगुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनाचा ३७८ वा अमृतमहोत्सवी बीज सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महर्षी वाल्मीक ऋषींच्या समाधी मंदिरात सकाळच्या प्रहरी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत व पुरोहितांच्या साक्षीने संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेसह महर्षी वाल्मीक ऋषींच्या संजीवन समाधीची देखील विधिवत पूजा करण्यात आली.यावेळी उत्सवमूर्तींच्या दर्शनानंतर इतरही धार्मिक कार्यक्रमांना सुरवात झाल्याने भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान होळ ( ता. फलटण ) येथील कीर्तनकार साहेबराव पढेर यांनी संत तुकाराम महाराजांचे अभंग गात सर्वांचीच मने जिंकली.त्यानंतर सामुहिक आरतीसह महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.  याप्रसंगी ह. भ. प.  बबनराव महाराज भुजबळ यांसह मोहनशेठ पवार दिलीप नाझरे राजेंद्र काळंगे मारुती रोकडे गिरीश पवार निलेश कुदळे मदन भुजबळ दीपक नाझरे हनुमंत पवार मोतीराम गावडे अनिल पवार कैलास गायकवाड सविता भुजबळ सुनीता पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

### शिरूर नगर परिषदेची थकीत रक्कम वसूलीसाठी कारवाई सुरु

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर नगर परिषद ने थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुलीसाठी धडक मोहीम राबवत दोन मालमत्तांवर सील ठोकण्याची कारवाई केली. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना कर वसुलीची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. नगरपरिषदेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर दरवर्षी १ एप्रिल रोजी देय होतो. पहिल्या सहा महिन्यांच्या आत कर भरणे अनिवार्य असून, अन्यथा महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १५० अ (१) नुसार थकीत रकमेवर दरमहा २ टक्के शास्ती कर आकारला जातो. नगरपरिषदेकडून सर्व मिळकतधारकांना आतापर्यंत भ्रमणध्वनीवरून चार वेळा कर भरण्याबाबत संदेश पाठविण्यात आले आहेत. सप्टेंबर २०२५ पासून कर न भरल्यास २ टक्के शास्ती कर आकारला जाईल, याची घंटागाडीच्या माध्यमातून शिरूर शहरात दवंडी देऊनही माहिती देण्यात आली आहे.  घोडनदी येथील करसंकलन विभागाने मुख्याधिकारी प्रितम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलली आहेत. त्याअंतर्गत  ४ मार्च २०२६ रोजी सी. टी. बोरा कॉलेज रोडवरील श्रीराम मार्केट सिटी येथील दोन थकीत मालमत्तांना सील करण्यात आले.मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी स्पष्ट केले की, थकीत कर न भरल्यास जप्ती व अटकावणीची कारवाई पुढेही सुरू राहणार आहे. त्यामुळे मिळकतधारकांनी त्वरित थकीत रक्कम भरून  कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जेजुरीच्या जयाद्री डोंगर खोऱ्यात वन्य जीवांसाठी पानवठ्यात पाणी

जेजुरी (दै. संध्या)

■ जयमल्हार प्रतिष्ठानचा सलग बाराव्या वर्षी उपक्रम

■ आणखी नवीन चार पाणवठे बांधणार



जेजुरी परिसरातील सह्याद्रीच्या डोंगर रांगेतील वन्यजीवासाठी जयमल्हार प्रतिष्ठानच्या वतीने वन विभागातील कडेपठार पायथ्याशी असणाऱ्या पाणवठ्यात टँकर द्वारे पाणी सोडून वन्य जीवांची तहान भागविण्यासाठी सलग बाराव्या वर्षी उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिर व कडेपठार मंदिर परिसरात सह्याद्रीच्या उपरांगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जयाद्री डोंगरांचा समावेश आहे.

या जयाद्रीच्या डोंगर खोऱ्यात बिबटे,कोल्हे, तरस, हरिने, ससे तसेच मोठ्या संख्येने मोर, गरुड, घार आदी वन्य पशू पक्ष्यांचे वास्तव्य आहे.

पुरंदर तालुक्याचा परिसर तसा नेहमीच दुष्काळी भाग समजला जातो. हिवाळ्यात झरे आटल्या नंतर उन्हाळ्याच्या सुरवातीलाच पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. पाण्या अभावी वन्य जीवांचे हाल सुरू होतात. पाण्यासाठी वन्यप्राणी गावात येतात अशावेळी या प्राण्यावर कुत्री हल्ला करीत असतात.

या वन्यजीवासाठी वन विभागाच्या वतीने या परिसरात आठ पाणवठे तयार करण्यात आले असून यात टँकर द्वारे पाणी सोडून उन्हाळ्यात या वन्य प्राण्यांची तहान भागवली जाते.

जेजुरी येथील जयमल्हार प्रतिष्ठानच्या वतीने सलग बारा वर्षे उन्हाळ्याच्या सुरुवातीला या पानवठ्यामध्ये पाणी सोडून व पक्षांना धान्य ठेवून वन्यजीव वाचविले जातात.

अनेक नागरिक या वन्य जीवांसाठी पाण्याचे टँकर देवून आपला व वाढदिवस साजरा करत असतात. शुक्रवार दिनांक 6 रोजी शिवजयंतीचे औचित्य साधून या पांनवठ्यात जेजुरी देवसंस्थान प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे यांच्या हस्ते टँकरद्वारे पाणी सोडून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावर्षीचा पहिला टँकर सचिन कुंभार व तुषार कुंभार यांच्या वतीने देण्यात आला.

या परिसरात असणारे पाणवठे कमी पडत असून  वन्य जीवांसाठी आणखी चार पाणवठे लोकसहभागातून लवकरच बांधण्यात येणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते सचिन कुंभार,कुमार गावडे,रमेश बयास तसेच जयमल्हार पतसंस्थेचे बाळासाहेब दरेकर प्रत्येकी एक पाणवठा बांधून देणार असल्याचे जयमल्हार प्रतिष्ठानचे संस्थापक विशाल बारभाई यांनी सांगितले.

जयमल्हार प्रतिष्ठानचे संस्थापक विशाल बारभाई, जेजुरी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे , माजी नगरसेवक रमेश बयास,नगरसेवक रोहित खोमणे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दरेकर, धनंजय केळकर, वन विभागाचे वनरक्षक धनंजय देवकर, वनसेवक गजानन बयास कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

पावसाळा सुरू होई पर्यंत डोंगर खोऱ्यातील सर्व पाणवठ्यात वन्य जीवांसाठी टँकरद्वारे पाणी सोडण्यात येणार असून नागरिकांनी वाढदिवस, लग्न, तसेच शुभकार्य प्रसंगी पाण्याचे टँकर उपलब्ध करून द्यावेत असे आवाहन यावेळी विशाल बारभाई यांनी केले.

## महिला दिनानिमित्त १००१ महिला शंख वादकांचा शंख वादन विश्वविक्रम

पुणे (दै. संध्या)

■ हिंदुस्थानातील पहिल्या  केशव शंखनाद पथकातर्फे आयोजन

हिंदुस्थानातील पहिले विश्वविक्रमी शंखवादकांचे केशव शंखनाद पथक यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या सन्मानार्थ १००१ महिलांचा सामूहिक शंखनाद आयोजित करण्यात येत आहे. या ऐतिहासिक उपक्रमातून जागतिक विश्वविक्रम करण्यात येणार आहे. रविवार दिनांक ८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता कर्वेनगर मधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत हा विश्वविक्रम केला जाणार आहे, अशी माहिती पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन यांनी दिली. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक (नि) रेखा साळुंखे, सोल्जर्स इंडिपेंडेंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशनच्या संस्थापिका सुमेधा योगेश चिथडे उपस्थित राहणार आहेत. नितीन महाजन म्हणाले, महिला शक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा गौरव करण्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त महिला शंखवादकांचा भव्य विश्वविक्रम उपक्रम आयोजित करण्यात येत आहे.

## भिगवण येथे विवाह सोहळ्यात कर्तृत्ववान महिलांचा होणार सन्मान

भिगवण (दै. संध्या)

**मंगल प्रसंगाला सामाजिक कार्याची जोड**

रविवार ८ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून  भिगवण येथे दहा कर्तृत्ववान महिलांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करून महिला सशक्तीकरणाचा अनोखा संदेश देण्याचा उपक्रम रणसिंग परिवाराने हाती घेतला आहे. रणसिंग परिवारातील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी प्रशासन अधिकारी राजेंद्र  नारायण रणसिंग ( खातगाव ता. करमाळा ) यांची कन्या, समाजकल्याण अधिकारी नम्रता रणसिंग हिचा विवाह ८ मार्च रोजी बुवाजी मधुकर शिंदे (पिंपरी ता. इंदापूर)  यांचे चिरंजीव शिवाजी शिंदे यांच्याशी  भिगवण येथील व्यंकटेश लॉन्स येथे होत आहे.

या मंगल प्रसंगाला सामाजिक बांधिलकीची जोड देत विवाहसोहळ्यातच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचा स्तुत्य निर्णय या परिवाराने घेतला आहे. सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात स्मृतिचिन्ह, शाल व ज्ञानेश्वरी ग्रंथ देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सन्मानित होणाऱ्या महिलांमध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा समावेश आहे.

अलिबाग येथील मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता माननीय डॉ. पूर्वा पाटील,उद्योजिका उषाताई आढाव (पोथरे), उमेद अंतर्गत कार्य करत अनेक महिलांना व्यवसायासाठी प्रवृत्त करणाऱ्या सारिका पवार (हिसरे), लग्नानंतर अपूर्ण शिक्षण पूर्ण करून शिक्षिका म्हणून कार्यरत राहत बी.ए., बी.एड., एम.ए. व SETसह पीएच.डी. संपादन करणाऱ्या डॉ. स्वातीताई  जाधव, अल्पवयात आदर्श कीर्तनकार म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या प्रगती रामराजे राजभोसले महाराज कोंढार-चिंचोली येथील डॉ. वैष्णवी गलांडे, पोलीस प्रशासनातील प्राजक्ता पाटील (खातगाव), केमिकल क्षेत्रात कार्यरत आरती गोरख मोरे (टाकळी), जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या माजी न्यायाधीश ॲड. संगीता यादव-देशमुख तसेच प्रतिकूल परिस्थितीत पतीसाठी स्वतःची किडनी दान करून त्यांना जीवदान देणाऱ्या  रुपाली संजय साळवे (पोंधवडी) यांचा समावेश आहे. विवाहसोहळ्याच्या आनंदाला सामाजिक कर्तृत्वाची जोड देत महिलांच्या संघर्ष, जिद्द आणि यशाचा सन्मान करण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## शेतकऱ्यांच्या सोयी सुविधेकडे बाजार समितीने लक्ष देण्याची मागणी

नारायणगाव (दै. संध्या)



स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे यांना निवेदन देण्यात आले आहे की,गणपीर डोंगराच्या पायथ्याशी धना मेथीचे मार्केट सुरू केले आहे. आपणांस स्वाभिमानी शेतकरी संघटना,शेतकरी बांधव,आडतदार,व्यापारी,मापाडी चांगल्या प्रकारचे सहकार्य करत आहेत. मार्केटला काँक्रेटीकरण कायमस्वरूपी करण्यात यावी व मार्केट स्थिर ठेवण्यात यावे. धना-मेथीसाठी कायमस्वरूपी डोम (शेड) उभारण्यात यावी. जेणेकरून शेतकऱ्यांचे भाजीपाला भिजणार नाही व ऊन वाऱ्यापासून संरक्षण होईल यासाठी डोम अत्यंत आवश्यक आहे.धना मेथीचे मार्केट प्रत्येक  आडतवर दररोज नंबर वाईज लिलाव चालू होत असतात.परंतु नंबर वारीनुसार लिलाव झाल्यामुळे अगदी उत्तम पद्धतीने व्यापार होत आहे.त्याचे शेतकऱ्यांना व शेतकरी संघटनेला समाधान आहे. परंतु,नंबर वाईज लिलाव झाल्यामुळे शेतकऱ्यांना रात्री बारा एक वाजता लिलाव करणे, धना मेथी मोजून देणे, व आडतदारांकडून पट्टी घेण्यापर्यंत प्रचंड वेळ जातो. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार व आडतदारांबरोबर विचारविनिमय करून एकाच वेळेला सर्व आडतरांनी लिलाव चालू केले तर, सोईस्कर होणार नाही का? याचा देखील आपण सर्वांबरोबर मीटिंग घेऊन आढावा घ्यावा व योग्य तो निर्णय घ्यावा? धना मेथीच्या मार्केटमध्ये प्रचंड धुळी असल्याची तक्रार शेतकरी करत आहेत.

त्यामुळे शेतकरी,व्यापारी इतर सर्वांना धुळीचा त्रास होत आहे.त्यामुळे सतत मार्केटमध्ये काम करणाऱ्यांना त्रास होत आहे. मार्केटमध्ये काम करणारे बांधव आजारी देखील पडत आहे. त्यामुळे मार्केटमध्ये दिवसांतून किमान दोन-तीन वेळा पाणी मारणे अत्यंत गरजेचे आहे.

## बापू चेमटे सरांना ‘आदर्श शिक्षक महाराष्ट्र भाषा रत्न’ पुरस्कार

कोरेगावमुळ (दै. संध्या)

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भोर तालुक्यातील वाठार हिंगे येथील मुरारबाजी देशपांडे विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक बापू यादव चेमटे यांना यावर्षीचा मानाचा ‘आदर्श शिक्षक महाराष्ट्र भाषा रत्न’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथील अमृतानुभव फाउंडेशन आयोजित ‘विश्व मराठी भाषा कर्तृत्व संमेलन २०२६’ या कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला. जागतिक मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून क्रीडा क्षेत्रात अनेक गुणवंत खेळाडू घडविल्याबद्दल चेमटे सरांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सुप्रसिद्ध पार्श्वगायक ज्ञानेश्वर मेश्राम, युवा उद्योजक राहुल पाटील, चित्रपट निर्माते संदीप राक्षे तसेच स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. बी. एन. खरात यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना चेमटे सर म्हणाले, “हा सन्मान राजगड ज्ञानपीठ संस्था, मुख्याध्यापक आणि माझ्या विद्यार्थ्यांच्या प्रेमाचे फलित आहे. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे खेळाडू घडवण्याचा माझा मानस आहे.”

## भक्तिभावपुर्ण वातावरणात श्री शिव महापुराण कथेची सांगता

शिरूर (दै. संध्या)



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पं.आचार्य प्रदीपजी मिश्रा यांच्या अमृतवाणीमधून दि.२४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत श्री शिवमहापुराण कथा पार पडली. श्रद्धा, विश्वास आणि सदाचार यांचा संदेश देत त्यांनी भाविकांच्या मनात अध्यात्माची ज्योत प्रज्वलित केली.

शिवनामाच्या गजरात आणि 'ओम नमः शिवाय’च्या जयघोषात हजारो भाविकांच्या उपस्थितीत गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या श्री. शिवमहापुराण कथेची भक्तिभावपूर्ण वातावरणात सांगता झाली. शिरुर परिसरात मागील सात दिवसात भक्तीचा महासागर उसळला होता.

“श्रद्धेने आणि विश्वासाने शिवपुराण कथेचे श्रवण केल्यास निश्चितच चांगले फळ मिळते. शिव आहे म्हणून सत्य आहे,” असे प्रतिपादन करत त्यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनातील ताणतणावांवर भाष्य केले. “आज भोजनाची कमी नाही, पण भूक नाही; सुविधा मुबलक आहेत, पण झोप नाही. माणूस गोड खातो, पण गोड बोलत नाही,” असे सांगत स्नेह, संयम आणि सद्वर्तनाचा संदेश त्यांनी दिला.

प्रदोष काळात एक दिवा लावण्याचा नियम, दररोज एक तांब्या पाणी शिवलिंगावर अर्पण करण्याची सूचना, तसेच बेलपानाचे आध्यात्मिक व आरोग्यदायी महत्त्व याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. “चुकीची कर्मे करू नका; जसे वागाल तसे फळ मिळेल,” असा कर्मयोगाचा संदेश देत त्यांनी शिवसाधनेतून जीवनात सुख, शांती आणि समाधान प्राप्त होते, असे सांगितले. नाशिक येथील कुंभमेळाव्यात शिवपुराण कथे साठी महाराष्ट्र शासनाने जागा उपलब्ध करून दिल्यास कथेचा कार्यक्रम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

लाखो भाविकांच्या स्वागतासाठी भोजन, स्वच्छता, आदरातिथ्य, पार्किंग व वाहतूक अशा स्वतंत्र समित्यांद्वारे नियोजनबद्ध व्यवस्था उभारण्यात आली होती. सुमारे ३० एकरांहून अधिक जागेवर उभारलेला भव्य आणि सुसज्ज मंडप भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरला. मुख्य मंडपासह प्रसादासाठी स्वतंत्र सुसज्ज मंडप उभारण्यात आला होता. दररोज हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

संपूर्ण परिसरात ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने वातावरण दुमदुमले होते. भजनांच्या तालावर भाविकांनी भक्तिरसात नृत्य करत अध्यात्मिक आनंद अनुभवला. शिरूर शहरात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम पार पडल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

समारोप सोहळ्याला मुख्य संयोजक उद्योगपती प्रकाश धारिवाल, उद्योगपती आदित्य धारिवाल, दिनाभाभी धारिवाल, साक्षी धारिवाल, आमदार माऊली कटके, माजी आमदार अशोक पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

भक्ती, शिस्तबद्ध नियोजन आणि समाजप्रबोधनाचा संगम असलेला हा सोहळा शिरूरकरांच्या स्मरणात कायमचा राहील, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली. ‘भोळ्या शंकरा’च्या कृपेची अनुभूती घेत हजारो भक्त भावपूर्ण मनाने परतले.आभार माजी नगरसेवक विजय दुगड यांनी मानले.

श्री शिव महापुराण या भव्य धार्मिक सोहळ्यास लाखो भाविकांनी उपस्थिती लावली.“श्री शिवमहापुराण कथा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला सदाचार, संयम आणि भक्तीचा मार्ग दाखवणारा उपक्रम आहे,” असे भावनिक प्रतिपादन मुख्य संयोजक उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल यांनी केले.कार्यक्रम सर्वांचा होता व तो यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.वडील रसिकभाऊ धारिवाल हे शिवभक्त होते असे उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल यावेळी बोलताना म्हणाले.

### महिलांसाठी सुरक्षित डिजिटल संवादाला नवा अर्थ देण्यासाठी एफआरएनडी कडून

# ‘सुरक्षित कन्व्हर्झेशन्स’ लॉंच

पुणे (दै. संध्या)

frnd

भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची पुढची लाट टियर २-४ शहरांमधून ऑनलाइन येत आहे. अशा वेळेस विशेषत: सार्थक संपर्काच्या शोधात असणाऱ्या महिलांच्या दृष्टीने सुरक्षितता हा डिजिटल विश्वासाचा निर्णायक घटक म्हणून पुढे येत आहे. भारताचा अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म आणि इंटरॅक्ट ग्रुपचे प्रमुख उत्पादन असलेल्या एफआरएनडी ने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'सुरक्षित कन्व्हर्झेशन्स' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या माध्यमातून या प्लॅटफॉर्मच्या महिला-प्रथम सुरक्षा डिझाईनवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून डिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता वाढवणे आणि या प्लॅटफॉर्मवर महिलांसाठी आदरयुक्त, सुरक्षित संवादाची संस्कृती निर्माण करणे हे एफआरएनडी चे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, कंपनी सुरक्षित ऑनलाइन वर्तन, धोके ओळखणे आणि प्लॅटफॉर्मच्या सुरक्षा वैशिष्ट्यांचा जास्तीत जास्त वापर करणे यांविषयी महिला वापरकर्त्यांना शिक्षित करण्यासाठी नियमित इन-ॲप सत्रे आयोजित करणार आहे. याशिवाय एफआरएनडी वापरकर्त्यांना जेव्हा गरज असेल तेव्हा रिअल-टाइम समर्थन आणि मार्गदर्शन पुरविण्यासाठी २४ x ७ टोल-फ्री हेल्पलाइन सुरू करणार आहे. अधिक सुरक्षित आणि अधिक समावेशक डिजिटल इकोसिस्टम तयार करण्याच्या भारत सरकारच्या दृष्टिकोनाशी ही मोहीम सुसंगत आहे. टियर २ ते ४ बाजारपेठेतील महिलांना ज्ञान आणि सुलभ मदत प्रणालींसह सुसज्ज करण्याचा ती प्रयत्न करणारी आहे जेणेकरून विश्वास हा प्रत्येक संवादाच्या केंद्रस्थानी राहील.

एफआरएनडीची निर्मिती भारतीय वापरकर्त्यांसाठी करण्यात आली असून सुरक्षितता ही या उत्पादनाच्या आर्किटेक्चरच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. या प्लॅटफॉर्मवर सध्या दररोज जवळजवळ दहा लाख संभाषणे केली जातात, त्यासाठी व्हिडिओ, ऑडिओ आणि चॅट संवादांचे निरीक्षण करणारी १०० सदस्यांची मॉडरेटरेशन टीम आणि रिअल-टाइम एआय सिस्टम यांचा आधार आहे.

सार्वजनिक रूम्समधील लाईव्ह मॉडरेशनपासून ते खाजगी संभाषणांमध्ये एआय-असिस्टेड तपासणीपर्यंत या प्लॅटफॉर्मच्या सुरक्षा प्रणाली गैरवापर वाढण्यापूर्वीच त्यांना रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आहेत. महिला वापरकर्त्या एका समर्पित सुरक्षा केंद्राचा लाभ घेऊ शकतात, तिथे त्यांना वापरकर्त्यांना त्वरित चेतावणी देणे, काढून टाकणे किंवा ब्लॉक करणे संभव होते. त्यामुळे त्यांना प्रत्येक संवादावर पूर्ण नियंत्रण प्राप्त होते. वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे अधिक रक्षण करण्यासाठी, व्हिडिओ कॉल दरम्यान स्क्रीन रेकॉर्डिंग आणि चॅटचे स्क्रीनशॉट घेण्यास प्लॅटफॉर्मवर सक्त मनाई आहे. आक्षेपार्ह सामग्री शोधण्यासाठी, रिअल टाइममध्ये चॅटचे विश्लेषण करण्यासाठी आणि वारंवार उल्लंघन करणाऱ्यांना अगदी त्यांनी नवीन डिव्हाइस किंवा ओळखीसह परत येण्याचा प्रयत्न केला तरीही ओळखण्यासाठी या प्लॅटफॉर्मवर एआयचा वापर करण्यात येतो. व्हिडिओ संवादादरम्यान स्क्रीनच्या ८० टक्के भागामध्ये वापरकर्त्याचा चेहरा असेल अन्यथा स्क्रीन धूसर होईल, असे या प्लॅटफॉर्मचे डिझाईन आर्किटेक्चर आहे.

इंटरॅक्ट ग्रुपचे सह-संस्थापक आणि सीईओ भानू प्रताप सिंग तंवर म्हणाले, “भारतात सोशल नेटवर्क्सचा खोलवर विस्तार होत असताना, सुरक्षितता हे आता एक आकर्षण राहिले नसून विश्वासाचा पाया बनली आहे. टियर २ ते ४ शहरांमधील अनेक महिलांसाठी, त्यांना इंटरनेट किती सुरक्षित वाटेल हे त्यांच्या पहिल्या डिजिटल संवादातून ठरते. एफआरएनडी मध्ये आम्ही एआय, मॉडरेशन आणि उत्पादन डिझाईन यांना एकत्र करून महिला-प्रथम सुरक्षा आर्किटेक्चर तयार केले आहे जेणेकरून संभाषणे सन्मानाची, हेतुपुरस्सर आणि सक्षम करणारे राहतील.